cmyk

## संपादकीय

### बोगसगिरीत सत्ताधारी अन् विरोधक दोघाचेही हित दडलेले

बिहार विधानसभेच्या मागच्या निवडणुकीत २० टक्के जागांचा निकाल केवळ अडीच टक्के अथवा त्यापेक्षा कमी मतांनी लागला होता. १७ जागांवर विजयी आणि पराभूत उमेदवारांमधील अंतर केवळ १ टक्का किंवा त्यापेक्षाही कमी होते. या राज्यात आता निवडणूक आयोगाकडून विशेष मतदार यादी पडताळणी मोहीम राबवली जाते आहे. त्यावरून प्रचंड गदारोळ सुरु आहे. निवडणूक आयोगाच्या हेतूबद्दल शंका घेतली जाते आहे. काही महिन्यांपूर्वी जर तुम्ही याच मतदार यादीवरून लोकसभा निवडणूक घेतली,


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### यूपीआय व्यवहारांसाठी आता पैसे मोजावे लागणार?

मुंबई : गेल्या काही वर्षांत ऑनलाईन व्यवहाराचे प्रमाण वाढले आहे. स्मार्टफोनवरून पेमेंट करण्याकडे कल वाढत आहे. यासाठी पेटीएम, फोनपे किंवा जीपेसारखी अनेक ॲप्स सध्या उपलब्ध आहेत. मात्र आता लवकरच यूपीआय व्यवहारांवर शुल्क लागू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यूपीआयला आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य बनवण्याची गरज रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अधोरेखित केली आणि हे डिजिटल व्यवहार कायम पूर्णपणे मोफत राखणे परवडणारे नाही, असेही त्यांनी सूचित केले. पायाभूत सुविधांच्या शाश्वततेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्याचे खर्च चुकते करावेच लागतील. कोणालातरी त्या खर्चाचा भार सहन करावा लागेल, असे ते म्हणाले. यूपीआय व्यवहारांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. दोन वर्षांत, दररोजचे यूपीआय व्यवहारांची संख्या ३१ कोटींवरून ६० कोटींपुढे पोहोचली आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–९२ रविवार, दि.२७ जुलै २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करू नका– खडसे

जळगाव–माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करू नका. मी कुणाकडे आतापर्यंत झुकलेला नाही आणि आणि झुकणार पण नाही असे राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

### माणिकराव कोकाटे शनी देवासमोर नतमस्तक

नंदुरबार–राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री माणिकराव कोकाटे नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. देशातील एकमेव शनी देवाचे साडेसाती मुक्त स्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या शनिमंडळ येथील शनी मंदिरात कोकाटे यांनी दर्शन घेतले आहे.

### मुंडेंना मंत्रीमंडळात घेण्यासाठी घाई कशासाठी?

मुंबई–भ्रष्ट मंत्र्यांची कॅबिनेटमध्ये गरज काय? धनंजय मुंडेंना मंत्रीमंडळात घेण्यासाठी अजित पवार इतकी घाई का करत आहेत ? असा सवाल खा. संजय राऊत यांनी केला आहे.

### राज्यातील ७५ टक्के मंत्री युजलेस–संजय राऊत

मुंबई : महायुती सरकारमधील ७५ टक्के मंत्री यूजलेस आहेत. त्यांना आपल्या कामाचे भान नाही अशी घणाघाती टीका संजय राऊतांनी केली. तसेच हे सर्व लुटारू, दरोडेखोरांप्रमाणे काम करत असल्याची टीका संजय राऊतांनी केली. सोबतच हे सर्व होत असताना मुख्यमंत्री फडणवीस गप्प का असा सवालही राऊतांनी केला आहे.

### राहुल गांधींचा पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल

नवी दिल्ली : काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदींवर हल्लाबोल केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी ही मोठी समस्या नाही. त्यांचा केवळ दिखावा आहे. त्यांची प्रतिमा वास्तवापेक्षा फुगवून सांगितली जाते अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये आयोजीत ओबीसींच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

### पीएम किसान लाभार्थ्यांच्या संख्येत चौपट वाढ

नवी दिल्ली : शेतकरी पीएम–किसान योजनेच्या २० व्या हप्त्याची वाट पाहत आहेत. असे असताना राज्यात लाभार्थी संख्येत मोठी वाढ झाल्याची माहिती समोर आली आहे. लाभार्थी शेतकरी संख्येत चौपट वाढ झाल्याचे समजत आहे. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात २१.८४ लाभार्थी होते. तर १९ व्या हप्त्यात ही संख्या ९३ लाखांवर पोहोचली आहे. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीतून ही बाब समोर आली आहे.

### गणेशमूर्तींच्या किंमतीत ३० टक्क्यांनी वाढ

मुंबई : राज्यात गणेशमूर्ती तयार करण्याची लगबग सुरू आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीवरची बंदी उठली. त्यामुळे मूर्तिकार खूश असले तरी यंदा गणेशमूर्तींच्या वाढत्या किमतीची झळ गणेशभक्तांना बसणार आहे. गणेशोत्सव अगदी काही आठवड्यांवर येऊन ठेपला असतानाच, गणेशभक्तांना यंदा महागाईची झळ बसणार आहे. यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. यामुळं उत्सवाच्या तयारीत असलेल्या भक्तांची आर्थिक गणितं कोलमडण्याची शक्यता आहे.

### संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्रातील खासदारांचे वर्चस्व

नवी दिल्ली–संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्रातील ७ खासदारानी बाजी मारली आहे. सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, अरविंद सावंत, नरेश म्हस्के, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी आणि वर्षा गायकवाड यांना संसदरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण योगादानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो.

# कांधाला बाजार समितीत अत्यल्प दर

## कांदा दराचा फटका; २८ जुलै रोजी उत्पादकांची बैठक



नाशिक । प्रतिनिधी

**राज्य शासनाने बाजार समितीच्या माध्यमातून कांद्याची खरेदी करण्याचा निर्णय घेतला असला तरी सध्या बाजार समितीत कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकरी नाराज आहेत. त्यामुळे दि. २८ जुलै रोजी कांदा उत्पादकांनी बैठक बोलावली आहे.**

बाजारभावात होत असलेली घसरण, सरकारचे होत असलेले दुर्लक्ष यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हैराण झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी २८ जुलै रोजी दुपारी २ वाजता महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने बैठक आयोजित केली आहे. लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कांदा मार्केटमध्ये ही बैठक होणार आहे. कांद्याच्या बाजारभावावरील गंभीर स्थितीवर या बैठकीत चर्चा होणार आहे. सध्या राज्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याला अत्यल्प दर मिळत आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडले आहेत. यासाठी अति तातडीने

▶▶ पान २ वर

> **कांदा दराबाबत कायमस्वरुपी तोडगा हवा**
>
> कांद्याचे दर कधी कमी होतील आणि कधी जास्त होईल, हे कधीही सांगता येत नाही. कमी भाव झाल्यावर शेतकऱ्यांनी कांद्यासाठी केलेला खर्चही निघत नाही. त्यामुळे कांदा दराबाबत शासनाने कायमस्वरुपी तोडगा काढण्याची गरज आहे.

# रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणाला गती

## लवकरच बीड ते अहिल्यानगर रेल्वे सुरू होण्याची शक्यता



बीड । प्रतिनिधी

**अहमदनगर –बीड–परळी संपूर्ण रेल्वे मार्गाला गती मिळत असून आता नगर ते विघनवाडी विद्युतीकरणाचे काम पूर्णत्वास गेले आहे आता विघनवाडी ते रायमोहा राजुरी दरम्यान रेल्वे विद्युतीकरणाच्या कामाला गती आली आहे वर्षभराच्या आत बीड ते नगर रेल्वे सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे**

बीड जिल्हा वाशियांचा जिव्हाळयाचा प्रश्न असलेल्या अहमदनगर बीड परळी हा रेल्वे मार्ग आता पूर्णत्वाकडे येत आहे नगर ते बीड आणि परळी ते बीड अशा दोन्ही बाजूने रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळत असल्याने लवकरच हा मार्ग पूर्ण होऊन परळी ते अहमदनगर अशी रेल्वे नियमित सुरू होण्याची दाट शक्यता आहे परळी पर्यंत रेल्वे पटरी चे काम पूर्ण झाले आहेत विशेषता वडवणीपर्यंत काम पूर्ण असून डिझेल वर प्रवासी वाहतूक रेल्वेला परवडत नाही हे आष्टी ते नगर रेल्वे चाचणी आणि प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आल्यानंतर रेल्वे विभागाने अनुमान काढला त्यामुळे आता विद्युतीकरणावर भर दिला जात आहे. विघनवाडी ते रायमोह पर्यंत रेल्वे मार्ग विद्युतीकरण काम सध्या सुरू आहे रेल्वेमार्ग तयार आहे मात्र विद्युतीकरण पूर्ण न झाल्याने सध्या रेल्वे सेवा बीड पर्यंत सुरू नाही.. बीडकरांना दैनदिन रेल्वे कधी सुरू होईल याची आशा लागलेली असून याकडे

▶▶ पान २ वर

# डॉ.संजय ढवळे यांचा संशयास्पद मृत्यू



बीड । प्रतिनिधी

**नेहमी चर्चेत असणाऱ्या बीडमध्ये एक खळबळजनक प्रकार घडला आहे. एका डॉक्टरचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला आहे. या डॉक्टरच्या मृतदेहाजवळ संशयास्पद वस्तू सापडल्या आहेत. यामुळ डॉक्टरच्या मृत्यूचे गूढ वाढले आहे.**

बीड शहरातील एका डॉक्टरचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. संजय ढवळे असे या डॉक्टरचे नाव आहे, शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह परिसरात डॉक्टर संजय ढवळे हे भाड्याच्या खोलीत राहायचे. त्याच ठिकाणी त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. त्यांच्या खोलीत भूल देणारे औषध आणि एक सिरिंज देखील आढळून आली आहे. त्यामुळे त्यांची आत्महत्या आहे की हत्या हे अद्याप अस्पष्ट आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत खोली मधील संशयास्पद वस्तू ताब्यात घेतल्या आहे. त्यांचा मृतदेह उत्तरीय

▶▶ पान २ वर

# जेलमधून थेट वाल्मिक कराडचा फोन आला

## आंबादास दानवेंच्या दाव्याने पुन्हा खळबळ



छ.सभाजीनगर । प्रतिनिधी

**वाल्मिक कराड आजही जेलमध्ये असताना अनेक गोष्टी करत असतो, असा गंभीर आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे. तर माझ्यासमोर बसलेल्या माणसाला वाल्मिक कराडचा फोन आला, असे म्हणत अंबादास दानवेंनी मोठा दावा केल्याचे समोर आले आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मास्टर माईंड वाल्मिक कराड सध्या कोठडीत आहे. कोठडीत असणाऱ्या कराडसंदर्भात विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी एक मोठा दावा करत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आणत एकच खळबळ उडवून दिली. दानवे म्हणाले, 'वाल्मिक कराड कोणाचा पाठीराखा आहे हे फक्त परळी किंवा बीडला नाही तर अख्या महाराष्ट्राला माहिती आहे. आजही वाल्मिक कराड जेलमधून वेगवेगळ्या

▶▶ पान २ वर

# चालत्या एसटी बसचे चाके निखळली ७० प्रवासी बचावले



बीड । प्रतिनिधी

**राज्य परिवहन महामंडळाने अनेक ठिकाणी नव्या आणि इलेक्ट्रॉनिक बसेस आणले आहेत मात्र काही बसेस जुन्या आणि खिळखिळ्या झालेल्या आहेत यातच नव्या वस्तूची अवस्था जुन्या पास सारखीच झाल्याची दिसून येत आहे आज छत्रपती संभाजीनगर कडून लातूर कडे जाणाऱ्या एसटी बसचे नेकनूर तालुका बीड जवळ चाके निखळले चालकाच्या प्रसंगावधानाने बस रस्त्याच्या बाजूला कशीबशी आणल्याने सत्तर प्रवासी बालमबाल बचावले.**

रस्ता तिथे एसटी थांबेल पण बसनेच जाईल असे अनेक गोड वाक्य एसटी महामंडळाकडून प्रवाशांना आकर्षित

▶▶ पान २ वर

### राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे फोन टॅप-रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी खळबळजनक दावा केला आहे. राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे फोन टॅप केले जात असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

रोहित पवार यांनी त्यांच्या 'एक्स' अकाऊंटवर एक पोस्ट करत दावा केला आहे. काही मंत्र्यांचे फोन बऱ्याचदा नॉट रिचेबल येत असून आपले फोन टॅप होत असल्याने मंत्री स्वत:हूनच फोन बंद ठेवतात, अशी चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. बघूया या केवळ चर्चा आहेत की वास्तव हे येत्या काळात कळेलच, असा दावा त्यांनी केला आहे.

# लाडकी बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करु

## अजित पवारांकडून इशारा, शासनाकडून घेतलेल्या पैशांची वसुली होणार




मुंबई । प्रतिनिधी

लाडकी बहिण योजनेमध्ये पुरुष लोकांची नावे येण्याचे काहीच कारण नाही, जर या योजनेत पुरुषांची नावे आलेली असतील तर ही योजना पुरुषांसाठी नव्हती, त्यामुळे ते पैसे आम्ही वसूल करू, त्यांनी जर सहकार्य केले नाही तर, लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेऊन जर त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असेल, तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करण्यास मागे –पुढे पाहाणार नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित

▶▶ पान २ वर

# राजकारण हा फुकट्यांचा बाजार–नितीन गडकरी



नागपुर । प्रतिनिधी

**राजकारण हा फुकट्यांचा बाजार असून माझ्या अनुभवातून सरकार हे निक्कमी असल्याचे खळबळजनक विधान केंद्रीय मंत्रीनितीन गडकरी यांनी नागपुरात एका कार्यक्रमात केले आहे. या विधानातून महाराष्ट्रातील राजकारण्यांना गडकरींनी खऱ्या अर्थाने आरसा दाखवला असल्याचे बोलले जात आहे.**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे ओळखले जातात. एखादी गोष्ट पटली नाही की ते थेट सांगतात. त्यांच्या कामाचा वेग, त्यांच्याकडे असलेल्या खात्याविषयी असलेली असलेली इत्यंभूत

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१.०० क्विंटल | २,४५१ | २,७२८ | २,५६८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल | १,९५० | ३,०७० | २,४९३ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,३०० | ६,५०० | ६,४२६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७१.५० क्विंटल | २,११० | २,८५८ | २,६३४ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २५.०० क्विंटल | ३,९०० | ३,९०० | ३,९०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,६०० | ५,१११ | ४,८५५ |

# लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

## भारतीय जनता पार्टीचे युवा नेते विष्णू भाऊ घुले यांच्या हस्ते टाकळी येथे राबवला उपक्रम

केज । प्रतिनिधी

**लोकनेत्या तथा मंत्री पर्यावरण व पशुसंवर्धन मा. ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवस निमित्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आला पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त इत्तर अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबवत आज केज तालुक्यातील टाकळी येथे भाजपा युवा नेते विष्णू भाऊ घुले तसेच गावातील सर्व ग्रामस्थ यांच्यावतीने आज नारळ व विविध फळांच्या वृक्षांची लागवड करण्यात आली यावेळी टाकळी सेवा सोसायटीचे चेअरमन रघुनाथ बारगजे बंडू तात्या घुले यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

केज तालुक्यातील टाकळी येथे आज मा. नामदार पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब मंत्री पर्यावरण व पशुसंवर्धन यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक उपक्रम राबवत केज येथील भारतीय जनता पार्टीचे युवा नेते श्री विष्णू भाऊ घुले यांनी इत्तर अनावश्यक खर्च टाळून नारळ व विविध फळांचे वृक्ष लागवड करून आपल्या लोकनेत्याचा वाढदिवस साजरा केला आहे व गावातील सर्व लोकांना या निमित्ताने प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावायला पाहिजे असा संदेश ही उपस्थित नागरिकांना विष्णू भाऊ घुले यांनी दिला जेणेकरून प्रदूषण होणार नाही व झाडे लावल्यामुळे दुष्काळही पडणार नाहीत त्यामुळे प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावल पाहजे असा संदेश या वृक्षारोपण लागवडीच्या निमित्ताने सर्वांनी घेऊया आणि पर्यावरण पूरक वातावरण करूया या वृक्ष लागवडी वेळी टाकळी गावातील सेवा सोसायटी चे चेअरमन रघुनाथ बारगजे, बंडूतात्या घुले,गोरख बारगजे, दिनुभाऊ, यमुनाथ घुले, टि पी घुले, मल्हारी गुरूजी, सोमनाथ घुले, अशोक बारगजे, भागवत बारगजे, नितीन बारगजे, दिगांबर मुंडे, शिवराम घुले, आश्रुबा घुले, सीताराम चौरे, दिनकर बारगजे, सतिश घुले, सुनिल घुले, भास्कर घुले, भागवत क्षिरसागर, बाबु बुवा भारती,शिवराज घुले,

▶▶ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# बोगसगिरीत सत्ताधारी अन् विरोधक दोघाचेही हित दडलेले

बिहार विधानसभेच्या मागच्या निवडणुकीत २० टक्के जागांचा निकाल केवळ अडीच टक्के अथवा त्यापेक्षा कमी मतांनी लागला होता. १७ जागांवर विजयी आणि पराभूत उमेदवारांमधील अंतर केवळ १ टक्का किंवा त्यापेक्षाही कमी होते. या राज्यात आता निवडणूक आयोगाकडून विशेष मतदार यादी पडताळणी मोहीम राबवली जाते आहे. त्यावरून प्रचंड गदारोळ सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या हेतूबद्दल शंका घेतली जाते आहे. काही महिन्यांपूर्वी जर तुम्ही याच मतदार यादीवरून लोकसभा निवडणूक घेतली, तर आता विधानसभा निवडणुकीच्या वेळीच आयोगाने फेर पडताळणीची टूम का काढली, असा सवाल आहे. विरोधी पक्षांना यात फसवेगिरी आणि बोगसगिरीचा वास येतो आहे. पाटण्यापासून दिल्लीपर्यंत ओरड सुरू आहे. विरोधी पक्षांचा मुद्दा रास्त असला, तरी निवडणूक आयोगही यावेळी पूर्ण तयारीत आहे. त्यांनी बिहारमधील मतदार यादीतील बनवेगिरीच आकडेवारीसह समोर आणली आहे.

बिहारच्या मतदार यादीत तब्बल ७७ लाख बोगस मतदार आहेत, असे आयोगाचे म्हणणे आहे. राज्याच्या विधानसभेच्या २४३ जागांचा विचार करता प्रत्येक मतदार संघात जवळपास ३० हजार बोगस मतदार आहेत. २०२० च्या निवडणुकीतील विजयी आणि पराभूत उमेदवारांतील फरक पाहता प्रत्येक मतदार संघातील बोगस मतांचा आकडा त्या मतदार संघाचा निकाल फिरवण्यासाठी पुरेसा आहे. आयोगाने बिहारमध्ये आता जी पडताळणी केली आहे त्यात जवळपास ७ लाख मतदार असे आहेत की त्यांची नावे एकापेक्षा जास्त मतदार याद्यांमध्ये आहेत. तब्बल ३५ लाख मतदार त्यांनी जो पत्ता दिला आहे तेथे राहतच नसल्याचे आढळून आले आहे. जवळपास १२ लाख ५५ हजार मतदारांचे निधन झाले आहे, तरीही त्यांची नावे मतदार यादीत आहेत. १८ लाख मतदारांनी त्यांचे जेथील यादीत नाव आहे ते ठिकाण कायमचे सोडले आहे. अशी एकूण ७० ते ७७ लाख ही संख्या आहे. ती नावे तशीच ठेवून विधानसभा निवडणूक घ्यावी असे थेट न म्हणता तशीच अपेक्षा विरोधी पक्ष करत आहेत. तर मृत मतदारांच्या नावावर बोगस मतदान होऊ द्यायचे का, जे आता बिहारऐवजी देशातील अन्य विधानसभेचे मतदार आहेत त्यांच्या नावावर बोगस मतदान होऊ द्यायचे का, असा प्रश्न जर निवडणूक आयोग विचारत असेल तर तो चुकीचा नाही. भारताचे संविधान अपात्र लोकांना मतदान करण्याची परवानगी देत नाही. निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे सूतोवाच आता विरोधी पक्षांकडून केले जाते आहे. तर लोकसभा निवडणुकीत अन्य राज्यांत काय प्रकार झाला त्याचीही उदाहरणे मांडली जात आहे.

जर कर्नाटकातील एका ठिकाणी शंभर टक्के बोगस प्रकार झालेला आम्हाला पाहायला मिळाला आणि त्याचे ठोस पुरावे आमच्याकडे आहेत तर अन्य ठिकाणीही असलेच प्रकार झाले असल्याची आमची खात्री आहे. मते चोरी करण्याचा हा प्रकार असल्याचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे म्हणणे आहे. तेलगू देसम हा केंद्रातील सत्ताधारी आघाडीतील पक्षही विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या काही मुद्द्यांशी सहमत आहे. बिहारमधील सत्ताधारी पक्षाच्या आमदारानेही मतदार यादी पडताळणीला आक्षेप घेतला आहे. त्या राज्यातून येणाऱ्या अन्य बातम्या पाहता सत्ताधारी पक्षाचे आमदारही या प्रकारामुळे धास्तावले आहे. त्याचे कारण कोणाचे नाव यादीतून कट होईल आणि त्याचा आपल्याला कसा फटका बसेल याबद्दल त्यांना भीती वाटते आहे. ही भीतीच सगळ्या गदारोळाच्या मुळाशी असलेले कारण आहे. जर ७० ते ८० लाख बोगस नावे मतदार यादीत असतील आणि ते निदर्शनास येऊनही त्यात दुरूस्ती न करता निवडणूक घेण्याचा आग्रह नव्हे हट्टच धरला जात असेल तर या बोगस प्रकारात सत्ताधाऱ्यांना आणि विरोधकांनाही आपले दडलेले हित दिसते आहे. यालाच आपण पारदर्शक आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रिया म्हणत होतो का? मतदार यादी स्वच्छतेची प्रक्रिया केव्हा सुरू केली गेली याला विरोध करताना स्वच्छतेची प्रक्रिया मान्य करण्याचे मोठेपणही भारतातील राजकीय पक्षांनी राजकीय विचारसरणीच्या पलिकडे जाऊन दाखवले पाहिजे.

# नरेंद्र मोदी हे विष्णूचे ११ वे अवतार

## उज्वल निकम यांच्या सत्कार सोहळ्यात भाजप नेत्याचे वक्तव्य

**मुंबई । प्रतिनिधी**

**ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नुकतीच राज्यसभेच्या सदस्यपदी वर्णी लागली, याबद्दल शनिवारी त्यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता, या कार्यक्रमात बोलताना भाजपच्या नेत्याने मोठे वक्तव्य केले आहे. नरेंद्र मोदी हे विष्णूचे ११ वे अवतार असल्याचे राज पुरोहित यांनी म्हटले आहे.**

ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नुकतीच राज्यसभेच्या सदस्यपदी वर्णी लागली, याबद्दल दादर येथील वसंत स्मृती सभागृहात उज्वल निकम यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सिद्धिविनायक ट्रस्टचे कोषाध्यक्ष पवन त्रिपाठी आणि भाजपचे नेते राज पुरोहित यांची देखील उपस्थिती होती, या सत्कार समारंभात बोलताना राज पुरोहित म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विष्णूचे ११ वो अवतार असल्याचे पुरोहित यांनी म्हटले आहे. नरेंद्र मोदी हे न थांबणारे न थकणारे पंतप्रधान आहेत, आपण अमेरिकेला जाऊन आलो की दोन दिवस जेट लॉक लागतो, मोदी फिनलंड, इंग्लंड दौरा करून अहमदाबादमध्ये दोन दिवसांत २२ उद्घाटनं करतात, त्यामुळे ते विष्णुचे ११ वे अवतार असल्याचे पुरोहित यांनी म्हटले आहे.

# वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम सावता महाराजांनी केले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**साडेसातशे वर्षापासून प्रवाहित असलेल्या वारकरी संप्रदायाने समाजातील अनेक दोष दूर केले. माणसातली जळमटे दूर केली. समाजातील जातीभेद,हिंसा, द्वेष,भेदाभेद दूर करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले असून वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**



यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजापर्यंत आणि त्यानंतरही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. सर्व संतांमध्ये श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वारकरी संप्रदायामध्ये कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सावता महाराजांनी वारकरी संप्रदायात कर्म अर्थात कर्तव्याला अधिक महत्त्व आहे हे निक्षुण सांगितले. प्रपंचातून देखील परमार्थ साधता येतो. केवळ परमार्थासाठी यज्ञ,याग,तप करणे जरुरीचे नाही हे सांगितले. समाज कर्म प्रधान बनवला. कर्म हाच धर्म असे सांगून माणसाला क्रियाशील बनवण्याचे काम सावता महाराजांनी केले. वारकरी संप्रदायाला व्यवहार्य बनविण्याचे काम सावता महाराजांनी केले. प्रपंच करून परमार्थ साधता येतो आणि परमार्थ म्हणजे शुद्ध अंतकरणाने केलेले नामस्मरण.अशा नामस्मरणामुळे माणसाचे अंतकरण शुद्ध होते आनंदी होते आनंद म्हणजेच धर्म होय. इतकी सुस्पष्टता वारकरी संप्रदायांमध्ये सावता महाराजांनी आणलेली आहे असे ते म्हणाले. बीड येथील नव्याने उभारलेल्या श्री संत शिरोमणी सावतामहाराज मंदिर स्थळी ते दर्शनासाठी आले असता ट्रस्टींनी शहरातील प्रमुख लोकांना एकत्रित बोलावून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा संवाद कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे जेष्ठ ट्रस्टी नामदेवराव दुधाळ हे होते. यावेळी ह.भ.प.अरुण डाके, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास बडगे,गणपत डोईफोडे, पत्रकार दिलीप ख्रिस्ती, नगरसेवक शुभम धूत, बाबुराव दुधाळ, विशाल घाडगे, दादासाहेब मुंडे, अॅड.सतिश शिंदे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्यामसुंदर घाडगे यांनी केले तर प्रास्ताविकात प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी श्री संत सावता महाराज मंदिराची देण जयदत्त क्षीरसागर यांची असून त्याचे संवर्धन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केल्याचे सांगितले. लोक सहभागातून होत असलेल्या या समाजोपयोगी वास्तूला माळी समाजातून प्रचंड योगदान मिळाले असून अन्य समाजाने देखील येथे आपले योगदान नोंदविले आहे,असे सांगितले. याप्रसंगी दादासाहेब मुंडे, मोहन गोरे, अध्यक्ष नामदेव दुधाळ यांची समायोजित भाषणे झाली. मंदिराला वस्तू रूपाने विशेष देणगी दिलेल्या दानशुरांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सुरुवातीला मंदिरात सावता महाराजांची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते झाली. यावेळी समाज बांधव उपस्थित होते.

# शिक्षण परिषदेला शिक्षणाधिकाऱ्यांची दांडी; लोणीकरांनी व्यक्त केली नाराजी

**जालना । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या धोरणामुळे शिक्षण अधिक सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थ्याभिमुख होईल, अशी अपेक्षा आहे. हे धोरण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि शारीरिक विकासावर लक्ष केंद्रित करते. शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम आणि मूल्यांकन पद्धतींमध्ये बदल करण्याची तरतूद आहे. २०२० मध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला, मग तो कोणत्याही सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा असो, शिक्षणाची संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले जातील.असे लोणीकर यांनी आज बोलताना म्हणाले.**

शिक्षणाचे महत्व अनमोल आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता मिळतात, ज्यामुळे त्यांचे जीवन सुधारते. शिक्षणामुळे व्यक्ती अधिक सक्षम होऊन चांगली नोकरी मिळवू शकते, चांगले जीवन जगू शकते आणि समाजाच्या विकासात योगदान देऊ शकते. शिक्षणामुळे व्यक्तीला विविध विषयांचे ज्ञान मिळते आणि वाचन, लेखन, गणित, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विविध कौशल्ये शिकायला मिळतात. शिक्षणामुळे व्यक्तीला चांगली नोकरी मिळवण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते. शिक्षणामुळे व्यक्ती सामाजिकदृष्ट्या अधिक जागरूक होते आणि समाजाच्या विकासात योगदान देऊ शकते. असेही लोणीकर यावेळी बोलताना म्हणाले. परतूर येथे तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला शिक्षणाधिकाऱ्यांची दांडी; आमदार लोणीकरांनी व्यक्त केली जाहीर नाराजी जालना जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती संगीता भागवत या परतूर तालुकास्तरीय शिक्षण परिषदेला गैरहजर असल्याबाबत बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणातून जाहीर नाराजी व्यक्त केली. परतुर तालुक्यातील सर्व शिक्षक एकत्रित आलेल्या असताना शिक्षण परिषदेसारख्या महत्त्वपूर्ण विषयावर शिक्षणाधिकाऱ्यांनाच गांभीर्य नसेल तर ही अत्यंत खेदाची बाब आहे अशा शब्दात लोणीकरांनी आपली नाराजी व्यक्त केली.

# मुलीनो स्वसंरक्षणासाठी सक्षम बना-रिंकल तायड

**जालना । प्रतिनिधी**

**समाजात दिवसेंदिवस गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असून , महिला व मुलीनी स्वसंरक्षणासाठी सक्षम बसून परिस्थितीशी सामना करावा असे आवाहन राष्ट्रवादी महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी केले .त्या जीवनराव पारे विद्यालय चंदनझिरा येथे आयोजित सक्षम तू या कार्यक्रमात बोलत होत्या.**

यावेळी मंचावर मुख्याध्यापक सुभाष पारे, दामिनी पथकाचे जोहरसिंग कलानी , कृष्णा शिंदे, नीता शिंदे, पथकाच्या सिमरन पठाण , रेशमा गुरुम ,शिल्पा पाचंगे , प्रियंका पवार , सोनम गोखले , मंदा ठोकळ , अनुराधा लोखंडे,काळे एस ए यांची उपस्थिती होती. राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिनांक २२ जुलै ते ३० जुलै हा सप्ताह जन विश्वास सप्ताह म्हणून राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सौ.रूपालीताई चाकणकर यांच्या संकल्पनेतून सक्षम तू उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.त्या अंतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनीं कायद्याविषयी माहिती देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीने नेहमीच समाजातील महिलांच्या सक्षमीकरणाचे काम केले आहे. जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय स्तरावर आपण गुड टच व बॅड टच बाबत माहिती घेतो परंतु दुर्दैवाने आपल्यासमोर असा प्रसंग आला तर आपण काय केले पाहिजे ? याविषयी आपल्याला माहिती नसते. म्हणून एक तर आपण शांत बसून राहतो किंवा कुटुंबाच्या इज्जती पोटी या बाबीची कुठेही वाच्यता करत नाहीत ,यामुळे गुन्हेगाराची हिम्मत वाढते व त्यांची ही वृत्ती दिवसेंदिवस वाढत जाते. याचा मुकाबला करण्यासाठी सक्षम तू या उपक्रमांतर्गत पोलीस प्रशासन यांच्या माध्यमातून व दामिनी पथकाच्या सहकार्याने शासकीय पातळीवर महिलांसाठी असलेल्या कायद्याची माहिती देण्यात आली. यामध्ये आपली जर कोणी छेडछाड केली किंवा इतरही कोणत्याही प्रकारची मनाला लज्जा वाटेल अशी कृती केली तर आपण न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधून गुन्हेगारीला आळा बसवावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी जोहरसिंग कलानी यांनी कायद्या विषयी तर सिमरन पठाण यांनी दामिनी पथका विषयी माहिती तर कृष्णा शिंदे यांनी उपाय योजनाची माहिती दिली. मुख्याध्यापक सुभाष पारे यांनी शाळेतील उपक्रमाची माहिती दिली.

# गेवराई तालुक्यात छुप्या मार्गाने जुगार अड्डे सुरूच; कॉइनच्या आडून पैशाचा जुगार

## तरुण व्यसनाधिनतेच्या आहारी ;अनेकांच्या संसाराची राखरांगोळी

**तलवाडा । प्रतिनिधी**

**सुरुवातीच्या काळात खुलेआम पत्त्यांचे क्लब चालवण्यास अनेकांनी सुरुवात केली होती त्यावेळेस अधिकारी आणि कर्मचारी यांना हाताशी धरून ही पत्त्यांचे क्लब चालवण्यात येत होते परंतु नव्याने रुजू झालेले पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी या अवैध धंद्यांना कायम स्वरुपी बंद करण्याचे आदेश जिल्ह्यातील पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना दिले होते हे धंदे बरेच दिवस बंद होते परंतु आता नव्याने हे पत्त्यांचे क्लब मनोरंजनार्थ क्लब च्या नावाखाली पुन्हा सुरू झाले असून याला पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी आर्थिक तडजोडीतून मान्यता दिल्या असल्याने पुन्हा एकदा हा जुगार छुप्या मार्गाने सुरू होण्यास पाठबळ मिळत आहे.त्यामुळे तरुण व्यसनाधीन होत असून यापाई अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत.त्यामुळे हे कधी बंद होते हे पहावे लागेल.**

जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी होता होत नसल्याचे दिसून येत आहे.रोज नवनवीन घटना उघडकीस येत आहे त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होतांना दिसून येत आहे.खुनाचे,मारहाणीचे,छेडछाडी,चोरी,वाटमारी ,यासह अनेक घटना जिल्ह्यात घडत आहेत. केज प्रकरणा नंतर जिल्ह्यात पोलिस अधीक्षक म्हणून आलेले नवनीत कावत यांनी कडक भूमिका घेऊन कायद्याची अंमलबजावणी करत जिल्ह्यातील अवैध धंद्याला उखडून टाकण्याचे काम केले होते,गुटखा, मटका,पत्त्यांचे जुगार, ऑनलाइन जुगार, सट्टा,वाळू चोरी,यासारख्या धंद्याला आळा घातला होता हे अवघे काही दिवस कडक बंद करण्यात आले होते परंतु आता बऱ्याच प्रमाणात सर्वच अवैध धंदे सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहेत,मटका खुलेआम सुरू नसला तरी मोबाईल वर घेतला जातो आणि खेळला जातोच,गुटखा हि चोरून लपून आणला जातो आणि विकला जातो ,वाळू चोरी ही अनेक ठिकाणी सुरूच आहेत.यामध्ये पत्त्यांचे क्लब ने मनोरंजनाच्या नावाखाली नवीन जागा घेतली असून बुद्धिकौशल्य,मनोरंज करण्याच्या नावाखाली सर्रास पैशाने जुगार अड्डे सुरू करण्यात आले आहेत.याठिकाणी कॉइन च्या आडून पैशाचाने तेरा पत्त्याची रमी नावाचा जुगार राजरोजपणे सुरू आहे.हे क्लब आर्थिक तडजोड करूनच चालवण्यात येतात हे सर्वश्रुत आहे परंतु मलिदा घेतल्यामुळे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करण्यात येताना दिसते.या ठिकाणी चार चार जण पार्टनर मिळून कोणते बुद्धिकौशल्य दाखवतात हे वेगळे सांगायची गरज नाही.जर खरच मनोरंजन असेल तर मग याठिकाणी येणाऱ्या सभासदा कडून पैसे घेऊन कॉइन देऊन का खेळवले जाते ,ज्यांचे कडे रोकड नाही त्यांच्या कडून फोन पे,गुगल पे द्वारे पैसे जमा करून घेतले जातात हे काही वेगळे सांगायची गरज नाही.तसेच या ठिकाणी दोन ते तीन कामगार राजाने कामाला ठेवले जातात याचे पगार देण्याचे आर्थिक भांडवल कशातून जमा करतात हे पण नकळण्याइतके अधिकारी नासमज नाहीत हे मात्र नक्की.या मनोरंजनाच्या ठिकाणी फक्त पत्तेच का खेळले जातात असा प्रश्न ही सामान्य लोकात उपस्थित होत असून हा चालणारा सवाल गोंधळ बंद व्हावा अशी सर्व सामान्य जनतेची मागणी आहे.परंतु याकडे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी काना डोळा करून एक प्रकारे समर्थन देतात का? अशीही चर्चा आता लोकात दिसून येते.

## पान १ वरून...

**कांद्याला बाजार समितीत**

उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे शिष्टमंडळाद्वारे निवेदन देणे, तसेच आवश्यक उपाययोजना सुचवणे या दृष्टीने ही बैठक आयोजित करण्यात येत आहे.

---------

**डॉ.संजय ढवळे**

तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. त्यांची हत्या की आत्महत्या याचा तपास शिवाजीनगर पोलिस करत आहेत. डॉक्टरचा मृतदेह आढळून आल्याने वैद्यकीय क्षेत्रात मात्र खळबळ उडाली आहे.

---------

**रेल्वे मार्गाच्या विद्युतीकरणाला**

सगळ्या जिल्ह्याचे लक्ष आहे.मात्र विद्युतीकरणाअभावी ही सेवा सुरुळीत होऊ शकलेली नाही.रायमोह पर्यंत सध्या विद्युतीकरण प्रक्रिया पोहोचलेली असून अजून ३० किंवा त्यापेक्षा अधिक दिवस बीड पर्यंत यायला लागू शकतात.विद्युतीकरण पूर्ण झाल्यानंतर हायस्पीड रेल्वे सेवा नगर ते बीड सुरू होणे शक्य आहे. महिनाभराच्या कालावधीमध्ये बीड रेल्वे स्थानकापर्यंत विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ट्रायल म्हणून आठ दिवस रेल्वे इंजिन धावणार आहेत त्यानंतर नियमित किंवा आठवड्याला दोन दिवस अशा स्वरूपात प्रायोगिक तत्त्वावर बीड ते नगर रेल्वे सुरू होण्याची शक्यता असून याच कालावधीमध्ये बीड पासून वडवणी आणि त्यानंतर पुढे तेलगाव आणि त्यानंतर परळी असा विद्युतीकरणाचा टप्पा राहणार असल्याची माहिती आहे त्यामुळे दोन महिन्याच्या कालावधीमध्ये बीड तर वर्षभराच्या कालावधीमध्ये परळी ते नगर ही पूर्ण विद्युतीकरणावर रेल्वे सुरू होण्याची शक्यता रेल्वे विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

--------

**चालत्या एसटी बसचे चाके**

करण्यासाठी वापरले जातात मात्र एसटी खेड्यापाड्यापर्यंत सेवा देत असली तरी त्या एसटीची दुरावस्था मात्र गंभीर झाली आहे भर पावसाळ्यात एसटी गळताना अनेक व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झालेले पाहिले असतील पण धावत्या बसचे चाके निखळून जाणे ही मोठी गंभीर बाब आहे मांजरसुंबा ते नेकनूर दरम्यान छत्रपती संभाजीनगर कडून लातूरकडे जाणारी एसटी बस एमएच २४ ए यु ८३ ३५ या एसटी बसचे स्पीड मध्ये असतानाच दोन चाके निखळून गेले त्यामुळे एसटी बस काही मीटरपर्यंत फरफटात गेल्याने आतील प्रवाशांचा जीव माझा मुठीत होता बस चालकाच्या प्रसंगावधानाने बस रस्त्याच्या कडेला कशीबशी उभी केली या बसमधील जवळपास ७० प्रवासी होते केवळ बसचालका मुळेच या प्रवाशांना काही इजा पोहोचली नाही

--------------

**जेलमधून थेट वाल्मिक कराडचा**

गोष्टी करत असतो. एकदा तर माझ्यासमोर एक माणूस बसला होता. त्याला कराडचा फोन आल्याने मला आश्चर्य वाटले. अशा गोष्टी ज्यावेळी होतात तेव्हा मोठा कोणाचा तरी पाठिंबा असतो. कराडला धनंजय मुंडेंचा पाठिंबा आहे हे लपून राहिलेले नाही', असा गंभीर आरोप करत दानवेंनी मोठा खळबळजनक दावा केला आहे.

---------

**लाडकी बहिण योजनेचा लाभ**

पवार यांनी दिला आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ १४ हजार २९८ पुरुषांनी घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पुरुषांना मिळालेल्या रकमेचा आकडा २१ कोटींहून अधिक आहे. या पुरुषांना योजनेत कुणी घुसवलं?, छाननी कोणी केली आणि महिलांसाठीच्या योजनेवर पुरुषांनी डल्ला कसा मारला?, त्यासाठी जबाबदार कोण?, असे प्रश्नही आता निर्माण झाले आहेत. यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठी अपडेट दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ज्या गरिब महिला आहेत, त्यांना मदत करण्यासाठी म्हणून ही योजना सुरू आहे, त्याच्यात मधल्या काळात पण तुम्ही पाहिले, काही महिला ज्या सरकारी नोकरी करत होत्या त्यांची पण नावे आली, जसे जसे एक- एक गोष्टी लक्षात येतायेत तस-तशी आम्ही ती नावे कमी करत आहोत, असे सांगून लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

**नेमकं काय म्हणाले अजित पवार?**

या योजनेमध्ये पुरुष लोकांची नावे येण्याचे काहीच कारण नाही, जर या योजनेत पुरुषांची नावे आलेली असतील तर ही योजना पुरुषांसाठी नव्हती, त्यामुळे ते पैसे आम्ही वसूल करू, त्यांनी जर सहकार्य केले नाही तर, लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेऊन जर त्यांनी या योजनेचा लाभ घेतला असेल, तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करण्यास मागे -पुढे पाहाणार नाही, असा इशारा अजित पवार यांनी दिला आहे.

----------------------

**लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या**

अनिल घुले,रावसाहेब बारगजे,अशोक घुले,विश्वनाथ घुले,राजेभाऊ आप्पा,अभिमान घुले,कल्याण घुले,मिनिनाथ घुले,प्रशांत बारगजे,नामदेव घुले,श्रीराम घुले,शिवाबापु,लक्ष्मन दादा,पोपट घुले,आकाश कदम, हनुमंत बारगजे,महादेव घुले,धनराज घुले,हरिदास घुले,अभिमान घुले, श्रीकांत बारगजे, राहुल बारगजे, मकरंद बारगजे, भास्कर बारगजे, शिवाजी सिरसाट, जनक सिरसाट, उत्तम सिरसाट, दत्ता राऊत, सुनिल काळे व इतर गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------

**राजकारण हा फुकट्यांचा**

माहिती, तोंडपाठ असलेली आकडेवारी यामुळे गडकरी कायम चर्चेत राहणारे केंद्रीय मंत्री आहेत. गडकरी हे असे नेते आहेत, ज्यांच्या प्रत्येक शब्दाला किंमत आहे. दरम्यान, त्यांनी आता नागपुरात बोलताना मोठे विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचे अनेक अर्थ काढले जातात. माझ्या अनुभवातून लक्षात आले आहे की सरकार निकम्मी असते, असे ते भाषणात म्हणाले आहेत. मला नागपुरात खेळाचे ३०० स्टेडियम बनवायचे आहेत. पण माझ्या चार वर्षांच्या अनुभवातून हे लक्षात आले की सरकार निकम्मी असते. महानगरपालिका, एनआयटी यांच्या भरवशावर काही काम होत नाही. चालत्या गाडीला पंक्चर करण्याचे महारथ यांच्याकडे आहे, असे नितीन गडकरी म्हणाले. तसेच, मी राजकारणात आहे. हा फुकट्यांचा बाजार आहे. प्रत्येक गोष्ट फुकटची पाहिजे असते. पण मी फुकटंच देत नाही, असे म्हणत त्यांनी देश तसेच राज्यातल्या राजकारणावर भाष्य केले.

--------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात...

### रामराव पोव्हरे यांचे निधन



माजलगाव । प्रतिनिधी

येथील शाहूनगर परिसरात राहणारे जुने किराणा व्यापारी रामराव लक्ष्मणराव पोव्हरे(८२) यांचे शुक्रवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी सकाळी ११ वाजता येतील मंगलनाथ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे.

### शुभांगी कुलकर्णीचे बुद्धिबळ पंच परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मूळचे मोगरा येथील रहिवासी असलेल्या सौ शुभांगी अमोल कूलकर्णी/मोगरेकर यांनी नुकत्याच कठीण नॉर्म असलेल्या अहिल्या नगर येथे झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ अरबीटर (पंच )परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश संपादन केले आहे.



आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ नियमावली,स्पर्धा आयोजन पेरिंग अरबीटरचा रोल आणि निर्णय या सारखे कठीण विषया मध्ये होते. राज्यस्तरापर्यंतच्या सर्व स्तरावरील सर्व प्रकारच्या बुद्धिबळ स्पर्धासाठी त्या आता पंच म्हणून कार्यरत होतील.तालुक्यातील मोगरा ग्रामीण भागातून येऊन बुद्धिबळ सारख्या कठीण खेळातील अरबीटर होणे अतिशय कौतुकास्पद आहे. गुणवंत खेळाडू विक्रम वीर, बुद्धिबळ खेळाडू वल्लभ कुलकर्णीच्या त्या आई आहेत पालक म्हणून वल्लभच्या यशासाठी सर्व प्रकारचे प्रयत्नशील आई म्हणूनतसेच बुद्धिबळ खेळविषयी असलेला समर्पण भाव आणि त्यांचा अभूतपूर्व यशाबद्दल छत्रपती संभाजीनगर बुद्धिबळ संघटनेचे सचिव हेमेन्द्र पटेल,मिथुन वाघमारे,अमरीश जोशी, विलास राजपूत, अमरदिप तिवारी, पत्रकार उमेश मोगरेकर, पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे यांनी विशेष अभिनंदन आणि कौतुक केले आहे

### ॲड.प्रकाश कवठेकर यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहीर

पुणे । प्रतिनिधी

बीड येथील तेजस ग्रुप चे चेअरमन माजी जि प सदस्य अॅड प्रकाश दादा कवठेकर यांना के पी एम मीडिया पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जि प सदस्य अॅड प्रकाश दादा कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे.



तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्वालिटी हे या कंपनी ने जपले आहे, सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वतःचा ब्रँड निर्माण करण्याचे काम दादांनी केला आहे आज मीतिला तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे.ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. आज मितीला मराठवाडा व शेजारील जिल्ह्यामध्ये वितरण होत आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सिने अभिनेत्री प्रार्थना बेहेरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न होत आहे हा सोहळा दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल राजमुद्रा एचपी पेट्रोल पंपाच्या मागे मारुंजी गाव हिंजवडी पुणे या ठिकाणी संपन्न होत आहे.

## ...तर आमदार शरद सोनवणे यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही

निमोणे : जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी रामोशी, फासेपारधी समाजाबद्दल काढलेल्या अवमानकारक वक्तव्याबद्दल माफी न मागितल्यास त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष दौलत शितोळे यांनी दिला आहे. शितोळे यांनी म्हटले की, काय भाग्य आहे पाहा आमचं! स्वातंत्र्याची जवळजवळ ८० वर्षे झालीत, तरी आजही कायदे मंडळाचा सदस्य, त्यांच्या भागात चोऱ्यामाऱ्या होतात म्हणून रामोशी, फासेपारधी जातीला जबाबदार धरतोय, तुमच्या व्यवस्थेत आम्ही मुकी माणसे जे तोंडाला येईल ते तुम्ही बोलणार; पण आमदारसाहेब आमचा इतिहास थोडा डोकावून पाहा. आम्ही चोऱ्या करणारे नाही.

# पालकमंत्री अजितदादांचा वादा बीड जिल्ह्यातील शाळांना निधी देवून निभावतील का ?

## ९४ शाळांना ईमारत नाही, ६०७ वर्गखोल्यांची दुरूस्ती आवश्यक,'' १४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव नियोजनकडे

बीड । प्रतिनिधी

काल दि.२५ जुलै शुक्रवार रोजी राजस्थानच्या झालावाड येथील सरकारी शाळेच्या वर्गाचे छत कोसळुन ३५ मुले दबली गेली त्यापैकी ७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असुन या दुर्घटनेत जखमी झालेल्या २८ पैकी ९ मुलांची प्रकृती गंभीर जखमी आहेत. या घटनेमुळे मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असुन बीड जिल्ह्यातील शाळा इमारतींची अवस्था वाईट असुन ९४ शाळांना ईमारतच नाही तर ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्यांच्या दुरूस्तीची आवश्यकता आहे तर १४७ नविन वर्गखोल्या बांधकाम करणे गरजेचे आहे.यासाठी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रूपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे दिला असुन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या ह्याला पाझर फुटेल काय? आणि शाळांच्या भवितव्यांसाठी निधी उपलब्ध करून देतील काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यात शाळा ईमारतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असुन धोकादायक मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा तसेच खोल्यांची दुरूस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी लक्ष्यवेधी आंदोलने करून शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. धोकादायक इमारतींच्या




भिंती,छत कोसळुन विद्यार्थी जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.अनेक ठिकाणी ईमारत नसल्याने शाळा उघड्यावर, मंदिरात, चावडीत भरत आहेत.पावसाळ्यात पाऊस आल्यावर अनेकदा शाळांना सुट्टीही द्यावी लागते.

अजितदादा दिलेला वादा पाळतील काय?शाळांच्या भवितव्यांसाठी ''डीपीसी'' मधुन निधी मिळेल काय?? ९४ शाळांना ईमारत नाही ,६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक,१४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव नियोजनकडे :- डॉ.गणेश ढवळे

शाळांच्या दुरुस्तीसाठी आणि धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वारंवार आंदोलने केलेली आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन निवेदन दिल्यानंतर अजितदादा यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते ते पाळतील काय??लोकभावना लक्षात घेऊन यावेळी जिल्हा नियोजन समितीमधुन शाळांसाठी भरीव निधी मिळेल अशी अपेक्षा असल्याने शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविलेला आहे. जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊन अनेक दिवस उलटले असले तरी अद्याप शाळा दुरूस्ती आणि नविन ईमारतींचे नियोजन झालेले नाही. शाळा सुरू होऊन दीड महिना उलटला असुन दुरूस्तीच्या हालचाली नाहीत.पावसात विद्यार्थी जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत असल्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गावात अनेक कामे करत असताना ईतर कामे थोडी बाजुला ठेवून लेकरांच्या भविष्यासाठी आवश्यक असलेल्या शाळा इमारतींसाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी विनंती डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात संघर्ष समितीची निदर्शने

## उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन ; विरोधक एकवटले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समितीकडून जोरदार घोषणाबाजी करीत तीव्र निदर्शने करण्यात आली. एकवटलेल्या विरोधी पक्ष आणि संघटना यांनी एकत्रितपणे येवून केलेल्या कायदा विरोधी संघर्ष समितीकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम – २०२४ हा कायदा रद्द करण्यात यावा या मागणीचे निवेदन देण्यात आले.**




अंबाजोगाईत जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समितीकडून जोरदार घोषणाबाजी करीत तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी अर्बन नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणल्याचा सरकारचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे असे सांगितले. तर राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, जनसुरक्षा हा कायदा आतून बाहेरून काळा असून सामान्यांची गळचेपी करणारा आहे. त्यामुळे जनतेचा सुरूवातीपासूनच त्याला विरोध आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाकडे बहुमत असल्याने त्यांनी बहुमताच्या जोरावर रेटून नेत कायदा मंजूर करून घेतला आहे, असा आरोप राजेसाहेब देशमुख यांनी करून केंद्र व राज्य सरकारचा परखड शब्दांत समाचार घेतला. आजची निदर्शने ही जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात असल्याचे कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांनी सांगितले. डॉ.नरेंद्र काळे यांनी जनसुरक्षा कायद्याचा तीव्र निदर्शने करून हा कायदा लोकशाहीच्या मुल्यांची गळचेपी करणारा असून, जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा रद्द करावा. व महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा द्यावा. या दोन्ही प्रकारांवर तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो. असे सांगितले. जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात आम्ही संघर्ष समितीकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची मागणी करणारे निवेदन देत आहोत हे नमूद केले. तर जनसुरक्षा कायदा देशांतर्गत सुरक्षेच्या नांवाखाली सामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणू शकतो असे कॉ.ॲड.अजय बुरांडे म्हणाले. अमर देशमुख यांनी जनसुरक्षा या कायद्याला तीव्र विरोध दर्शवत, त्याची अंमलबजावणी थांबवावी आणि कायदा रद्द करावा, अशी मागणी केली. ॲड.माणिक आदमाने जनसुरक्षा कायद्यामागचा हेतूच मुळात काळा आहे. या कायद्याचा फायदा फक्त सरकार व सरकार धार्जिणे उद्योगपती यानांच होणार आहे. असे सांगितले. तर ॲड.शिवाजी कांबळे यांनी, सरकारचे फक्त कौतुक करा नाही तर गप्प बसा आणि विरोधात बोलाल तर जनसुरक्षा कायद्याचा बडगा उभारून तुम्हाला गप्प करू हाच यामागचा हेतू आहे, असा आरोप केला. ॲड.माधव जाधव यांनी हा कायदा नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणारा आहे असे सांगितले.

पान ६ वरून...

### पिंपळवंडी,पांगरी,वाडी

गेल्या आठ दिवसांपासून सदरील बिबट्या दररोज मानव वस्तीमध्ये,आणि शेतामधील प्राण्यांना लक्ष करीत आहे.हांडेवाडी येथील लक्ष्मण शहाजी धनवडे यांची शेळी तसेच घोळेवाडीतील गोविंद लक्ष्मण जाधव यांचे घोड्याचे शिंगरु बिबट्याने फस्त केले.तर विष्णु घोळवे यांच्या दोन गाई,संभाजी जाधव यांच्या दोन मेंढ्या,भाऊसाहेब घोळवे यांची गाय तर अशोक तांबे यांची शेळी आणि कांतीलाल गायकवाड यांच्या शेळीवर हल्ला करुन त्यांना फस्त केले आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावावा आणि शेतकऱ्यांना भयमुक्त करावे अशी मागणी सरपंच सुभाष घोळवे यांनी केली आहे.

### जलजीवनच्या नावाखाली

प्रवास असून त्यांना आशा चिकाळातून प्रवास करावा लागत आहे. हा रस्ता पूर्वी चांगला होता परंतु या पाइप लाइनमुळे या रस्त्याची दुरव्यवस्था झाली असून सदरील गुत्तेदार,सरपंच व ग्रामसेवक यांनी तात्काळ या रस्त्याची व्यवस्था करावी अन्यथा आम्ही गावकऱ्यांच्या वतीने खड्यात बसून आंदोलन करणार आहे.

–राहुल सावंत

गावकरी कुप्पा

### ना. पंकजाताईंचा वाढदिवस

ठिकाणी ताईंचा वाढदिवस हा वृक्षरोपण, आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, जनावरांना चारा व अनेक समाजोपयोगी कार्यक्रम होत आहेत असे मत श्री सुघोष मुंडे यांनी व्यक्त केले यावेळी उपस्थित भाजप समन्वयक श्रीकांत सानप,रोहित भैया पंडित,शिवसेना तालुका प्रमुख उद्धव बापू मडके,संजय काळे,राहुल राका,धर्मराज आहेर,बाबा घोडके,मजूर भाई,डॉ.शेख इब्राहिम,ख्वाजा भाई, कृष्णा बारगजे, कृष्णा ढाकणे,श्री. खेट्रे सर,सरपंच अशोक खरात,महेश नागरे,योगेश नागरे,वाघमोडे महाराज,राठोड महाराज,अनिकेत मुंढे,शिरीष मुंढे,आंधळे बी.बी,ढाकणे सुनील,खेडकर किशोर, नागरे भारत,ढाकणे अमोल,बारगजे सचिन,क्षीरसागर रमेश, जावळे राहुल,सय्यद मोजम,नारायण खेडकर,किरण मिसाळ, वामन गिते,सय्यद सलमान,सय्यद आमिर इत्यादी उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे सूत्र संचालन सुनील मुंढे यांनी केले.

### माजलगाव बसस्थानकात

यांचेसह केला असल्याचे कबुली दिली. त्यास अटक करुन गुन्ह्यात गेलेला मुद्देमाल रोख २२ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अंबेजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, तुळशिराम जगताप, पो.ह.कृष्णा जायभाये, किशोर जाधव, बाळकृष्ण जायभाये. यांनी केली आहे.''

### फोनपेवरून जबरदस्तीने रक्कम

रहमान पठाण (वय ३२, रा. पेन्शनपुरा, अंबाजोगाई) यांना स्थानिक गुन्हे शोध पथकाच्या मदतीने तात्काळ अटक करण्यात आली. पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपासाद्वारे तब्बल ७४ हजार ९ रुपये या आरोपींकडून जप्त केले असून, उर्वरित रक्कम मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कारवाईत अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, पोलीस उपनिरीक्षक रविकुमार पवार, आनंद शिंदे यांच्यासह पोलीस अंमलदार श्रीकृष्ण वडकर, मनोज घोडके, रवी कुमार केंद्रे, हनुमंत लाड, हनुमंत चादर, पांडुरंग काळे व भागवत नागरगोजे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या या तत्पर कारवाईचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### मोमीनपुरा परिसर येथील

सत्काराचे आयोजन बीड राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व शेख निजाम मित्र मंडळ यांच्यातर्फे दिनांक २७ जुलै २०२५ सायंकाळी ठीक ७ वाजता करण्यात येणार असून यावेळी सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित शेख निजाम यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार असून सदरील विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मिल्लत नगर मोहम्मद कॉलनी भागाचे माजी नगरसेवक हाफिज अशपाक ,मोमीन जुबेर, सत्तार भाई इनामदार, सय्यद आजम, शेख कदीर, शेख जाकीर, शेख नसीर शेख हमीद, शेख सर्फराज, आदींनी केले आहे

# कारगिल युद्धातील अनुभव ऐकून उपस्थित गहिवरले..!





अंबाजोगाई । प्रतिनिधी


येथील जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेने २६ व्या कारगिल विजय दिवस निमित्त शहिद भारतीय जवानांना अभिवादन केले. संस्था परिसरात युद्ध स्मारक स्तंभावर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप यांच्या हस्ते रित परेड करण्यात आला. या परेडनंतर कारगिल युद्धामध्ये शहिद झालेल्या वीर सैनिकांना त्यांच्या अतुलनिय कार्याच्या स्मृती जागवत आदरांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप, सचिव माजी सुभेदार आबासाहेब हाके, कोषाध्यक्ष बाबासाहेब केंद्रे, संचालक भरत पांचाळ, संचालक अरविंद तपसे, संचालक ज्ञानेश्वर कदम, संचालक सिंधुताई निर्मळ, सभासद दिलीप निकम, सर्व सन्माननिय सभासद श्री अंकुश काळे, गोपीनाथ काळे, राधाकिशन कुंडगर, शिवाजी गंगणे, पांडुरंग गावडे, यशवंत व्हावळे, संभाजी वाघमारे यांच्यासह यांच्यासह संस्था वसाहती मधील पुरूष व महिला भगिनी यांनी उपस्थित राहून कारगिल विजय दिवस साजरा केला. या प्रसंगी कारगिल युद्धामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या योध्यांनी कारगिल युद्धातील आपले अनुभव कथन केले. विविध प्रसंग उभे केले. आपल्या अनुभवातून त्यांनी उपस्थितांना कारगिल युद्धातील विविध प्रसंग सांगितले. या प्रसंगी उपस्थित महिला, पुरूष यांचे डोळे भरून आले, मन गहिवरले, प्रारंभी संस्थेचे सचिव व कारगिल युद्धामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेले माजी सुभेदार आबासाहेब रंगनाथ हाके यांनी कारगिल युद्धाबाबतची माहिती उपस्थितांना दिली. तर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग शेप यांनी कारगिल युद्ध का, कसे व कोणत्या कारणामुळे घडले. हे सांगून कठीण परिस्थितीत भारतीय सैन्याने आपले मनोधैर्य न खचू देता शत्रुशी दोन हात केले., प्रखर लढा दिला व शौर्याचे धाडस दाखवून विजय संपादन केला. ही गाथा म्हणजे कारगिल विजय दिवस होय. या युद्धात शौर्य गाजविणाऱ्या सर्व भारतीय सैनिकांना अभिवादन करीत असल्याचे कॅप्टन पांडुरंग शेप यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार संस्थेच्या वतीने मानण्यात आले.

# सिध्देश्वर मंदिरात श्रावणमास उत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरवासीयांचे आराध्य दैवत असलेल्या सिध्देश्वर मंदिरात श्रावणमास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन महिणाभरात भस्मआरती, विवीध अलंकार, पारायणाचे आयोजन करण्यात आले असुन याचा भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



सिंदफणा नदीकाठावर असलेल्या पुरातन सिध्देश्वर मंदिरात श्रावणमासानिमीत्त मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. यावर्षीच्या श्रावण मास उत्सवात दि. २८ जुलैला प्रथम सोमवारी सहस्त्र बेल अर्चन व अरणेश्वर महादेव शृंगार, दि. ४ ऑगस्टला व्दितीय सोमवारी सहस्त्र कमळ पुष्प अर्चन व फुल बंगला शृंगार, दि. ११ ऑगस्टला तृतीय सोमवारी सहस्त्र भस्म अर्चन व बाबा बर्फानी शृंगार, ५६ भोग नैवेद्य, दि. १८ ऑगस्टला चतुर्थ सोमवारी सहस्त्र पंचफुल अर्चन व जलविहार शृंगारसोबत एक हजार लाडु नैवेद्य चढविण्यात येणार आहे. त्याचबरोबर दि. २ ते ४ ऑगस्ट दरम्यान शिवलीलामृत सामुहिक पारायण, दि. ३ ऑगस्टला रात्री रूद्र पुजा व सत्संग, दर श्रावण सोमवारी सुर्योदय ते सुर्यास्त असा अखंड रूद्र अभिषेक तर दि. २१ श्रावण मासिक शिवरात्री निमीत्त भगवंतास भस्मआरती असे धार्मीक कार्यक्रम होणार आहेत. याचा भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात लेखक, प्राचार्य डॉ. विवेक घोबाळे यांनी केला प्रवेश-साहित्यिक डॉ.यादव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संविधान व जागृती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अंबाजोगाईच्या वतीने स्मृतीशेष घनःशाम समिंद्राबाई एकनाथ घोबाळे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ त्यांच्या पावन स्मृतीस लेखक प्राचार्य डॉ. विवेक आशा घनःशाम घोबाळे यांनी स्वयं हिंदी लिखित सुषम बेदी का गद्य साहित्य या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा घेऊन वाहिली साहित्यिक श्रद्धांजली! या कार्यक्रमाच्या स्वागत व सत्कार प्रसंगी प्रा. राहुल सुरवसे व त्यांचा संच यांनी ''परिवर्तनवादी प्रबोधनपर गीतांचे'' सुंदर असे सादरीकरण केले. सर्वप्रथम कार्यक्रमात ग्रंथांची पूजा करून वडिल स्मृतीशेष घनःशाम घोबाळे व स्मृतीशेष प्रवासी कथाकार सुषम बेदी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण



करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर मान्यवरांना शॉल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा यथोचित गौरव व सत्कार करण्यात आला. व यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादाहरी कांबळे तर साहित्यकार, प्रमुख वक्ते डॉ. सतीश यादव, लातूर, श्रीमती आशा घनःशाम घोबाळे (आई), प्रमुख पाहुणे प्राचार्य दामोदर थोरात, ॲड. शाम तांगडे, उपप्राचार्य रमेश शिंदे, प्रख्यात कवी गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे, डॉ. अहिल्या बरुरे, डॉ.रोहिणी खंदारे, ॲड. दिलीप गोरे, श्री प्रशांत लाटकर, श्री सूर्यकांत लाटे व ॲड. विशालजी घोबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर या कार्यक्रमासाठी ज्यांनी ताकदीने प्रयत्न केले असे संयोजन समिती सदस्य प्रा. प्रमोद सिताप, प्रा. अनिल बांगर, श्री सचिन गायकवाड, श्रीपाद कुलकर्णी, ॲड. संतोष देशपांडे, प्रा. दत्ता कलेढले, श्री सुशील कदम, श्री सुनील वाघमारे, सौ. शिल्पा घोबाळे, सौ.रेखा घोबाळे, घोबाळे परिवार तसेच महाविद्यालयाचे छात्र-अध्यापक नमिता झिरमिरे, आरती दळवी, हनुमंत शिंदे, बालाजी आचार्य, श्रीनिवास पांचाळ, रमशा सय्यद, पूजा पांचाळ, ज्योती माने, जयश्री वाघमारे, सहकारी प्राध्यापक, डॉक्टर, वकील आदींनी अथक प्रयत्न घेऊन कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला. या कार्यक्रमासाठी ''लेखकावर प्रेम करणारी माणसं'' अंबाजोगाई, बीड, धारूर, लातूर, माजलगाव, परभणी इत्यादी ठिकाणाहून साहित्यप्रेमी, रसिक श्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर आशा घोबाळे निवास फ्लावर्स लाईन येथे सुरुची भोजनाची उत्तम अशी व्यवस्था करण्यात आली होती.



## छोटेवाडीत ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी येथे ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त छोटेवाडी,रामनगर ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने दि.२६ जुलै शनिवार रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

गावातील ग्रामपंचायत कार्यालय,शाळा, हनुमान मंदिर परिसरात चिंच,आंबा,वड,तुळस,या झाडांचे वृक्षारोपण करून वृक्ष संगोपनाचा संकल्प यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी केला.

यावेळी सरपंच अंगदराव कटके, उपसरपंच बाळासाहेब चव्हाण, ग्रां सदस्य बाळासाहेब कटके, ज्ञानेश्वर बागल, वरिष्ठ तंत्रज्ञ गोविंद शिंदे, तंत्रज्ञ जफर शेख व गावातील महेश सोळंके, शिवाजी कटके, सुधाकर राठोड ,हनुमान इंगळे, अनिरुद्ध सोळंके, नितीन कटके, भास्कर राठोड, आत्म दळवी, अशोक माळेकर, बाळराजे इंगळे, भागवत इंगळे, अनुरथ कटके, प्रल्हाद इंगळे, केरबा भांगे, राम प्रधान ,गोरख दळवी, सर्जेराव कटके, शिवाजी प्रधान, व्यंकटी राठोड, भगवान बिडवे, सुभाष घाडगे ,संदिपान खरात, सुदाम शेरकर, अजित कटके ,महेश कटके, योगेश कटके यांची उपस्थिती होती.

cmyk

# हवामान बदलाचा फटका फळ आणि भाजीपाला पिकांना

## राज्यसभेत केंद्र सरकारची कबुली

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

शेती क्षेत्राला हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसत आहे. त्यामुळे विविध पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभेत शुक्रवारी (ता. २५) विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना केंद्रीय कृषी राज्यमंत्री भगीरथ चौधरी यांनी सांगितले की, देशातील काही भागांमध्ये फळ आणि भाजीपाला उत्पादनात ६५ टक्क्यांपर्यंत घट झाली आहे.

हवामान बदलामुळे विशेषतः अनियमित पावसाच्या सरी आणि वाढते तापमान यांचा फळभाज्यांच्या उत्पादनावर थेट परिणाम होत आहे. कांद्याच्या पिकात सलग सहा दिवस पाण्याचा साठा झाल्यास ३६.६ टक्के उत्पादन घटते. टोमॅटो पिकाच्या फुलधारणेच्या टप्प्यात जर तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले, तर उत्पादनात तब्बल ६५ टक्क्यांपर्यंत घट होते. त्याचप्रमाणे हिवाळ्यात तापमानात १.५ ते २ अंश सेल्सिअस वाढ झाल्यास सफरचंदाच्या उत्पादनात ३० टक्के नुकसान होते, असेही चौधरी यांनी सांगितले. तापमानात एक अंश सेल्सिअस वाढ झाल्यास गोड्या पाण्यातील तसेच समुद्री माशांच्या विविध प्रजातींच्या अस्तित्वावर आणि त्यांच्या भौगोलिक वितरणावरही मोठा परिणाम होतो. खाऱ्या पाण्यातील मत्स्यपालनाला मध्यम तीव्रतेच्या हवामान बदलांचा फटका बसतो आणि यामुळे २० ते ४० टक्के नुकसान होते. तर पूर, अतिवृष्टी, चक्रीवादळ अशा टोकाच्या हवामान घटनांमुळे ५० ते १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### ‘राष्ट्रीय कीड निरीक्षण प्रणाली’ सुरू

हवामान बदलामुळे पिकांवर होणाऱ्या कीड प्रादुर्भावावर वेळेत उपाय करता यावा यासाठी ‘राष्ट्रीय कीड निरीक्षण प्रणाली’ सुरू करण्यात आली आहे. यामध्ये एआय आणि मशीन लर्निंगच्या साहाय्याने पीकांवरील कीडप्रादुर्भाव लवकर ओळखता येतो. या प्रणालीचा वापर १० हजारांहून अधिक कृषी सहाय्यक करत असून ती सध्या ६१ पीकांवरील आणि ४०० पेक्षा जास्त कीटक ओळखू शकते, असा दावाही ठाकूर यांनी केला.

दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात राज्यमंत्री चौधरी यांनी सांगितले की, डीआरआर धन १०० (कमला) आणि पूसा डीएसटी हे जिनोम एडिट केलेले भाताचे वाण सुरक्षित असून त्यांचा पिकांच्या जैवविविधतेवर कोणताही प्रतिकूल परिणाम होत नाही. या वाणांची निर्मिती सार्वजनिक क्षेत्रात तयार झालेल्या बीपीटी ५२०४ आणि एमटीयु १०१० या पारंपरिक वाणांपासून झाली आहे. ही वाण पूर्णपणे देशी तंत्रज्ञानावर आधारित असून शेतकऱ्यांच्या बीज स्वातंत्र्यावर याचा कोणताही परिणाम होणार नाही, असेही चौधरी यांनी स्पष्ट केले.

### कृषी क्रांती ४ साठी कार्यक्रम

.‘कृषी क्रांती ४.०’ या संकल्पनेविषयी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी सांगितले की, कृषी उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी, शाश्वत शेतीसाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि इंटरनेट ऑफ थिंग्स (आयओटी) तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना राबविल्या आहेत. ‘किसान ई-मित्र’ नावाचे एआय आधारित आवाजावर चालणारे चॅटबॉट विकसित करण्यात आले असून, ते पीएम किसान सन्मान निधी योजनेसह इतर योजनांबद्दल शेतकऱ्यांना माहिती देते. हे चॅटबॉट ११ प्रादेशिक भाषांमध्ये उत्तर देत असून दरदिवशी २० हजारांहून अधिक शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळते. आतापर्यंत ९५ लाखांहून अधिक प्रश्नांची उत्तरे या प्रणालीने दिल्याचे ठाकूर म्हणाले.

# येत्या हंगामासाठी आतापासूनच करा सिताफळ बागेचे नियोजन



कोरडवाहू जमिनीत देखील सिताफळ पीक चांगले येते असे म्हटले जाते. परंतु यामध्ये तुम्ही केलेल्या परफेक्ट नियोजन आणि व्यवस्थापन तसेच अगदी उशिरा न करता अचूक वेळेला केलेले नियोजन खूप उपयोगी पडते. शेतकऱ्यांनी यंदाच्या हंगामात आतापासूनच अचूकपणे नियोजन केले तर मिळणारे उत्पादन नक्कीच बंपर स्वरूपात मिळेल.

संरक्षित पाण्याच्या पाळ्या : सिताफळ बागेला नियमित पाण्याची गरज नसते. अगदी तुम्ही पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्यावर देखील सिताफळाचे चांगले उत्पादन मिळवू शकतात परंतु संरक्षित पाण्याच्या पाळ्या या सीताफळाच्या झाडाची वाढ आणि उत्पादनासाठी व फळधारणा इत्यादी गोष्टीसाठी खूप उपयुक्त आहेत. सीताफळाच्या झाडाला पहिली तीन-चार वर्ष जर पाण्याचे व्यवस्थित नियोजन विशेषतः उन्हाळ्यात चांगले केले तर झाडांची वाढ चांगली होण्यास मदत होते व फळधारणा देखील चांगली होते. त्यासोबतच फळधारणा झाल्यानंतर सप्टेंबर- ऑक्टोबर महिन्यात एक ते दोन पाणी दिल्यास येणाऱ्या फळाची प्रत व त्याचा आकार खूप उत्तम असतो.

हलक्या छाटणीची गरज : सीताफळाच्या झाडाला योग्य वळण यावे यासाठी वाढीच्या सुरवातीच्या काळामध्ये हलक्या छाटणीची गरज असते. जर तुम्ही झाडाला योग्य वळण दिले व झाड एका बुंध्यावर वाढवले तर झाडाची वाढ डौलदारपणे होते. नाहीतर अनेक फांद्या असलेले एक झुडुपवजा झाड तयार होते. त्यामुळे झाडाची वाढ कमी होते व साहजिकच मिळणारे उत्पादन देखील कमी मिळते. त्यासाठी एक मीटर खोडावरील सर्व फुटवे काढून त्याच्या चारही बाजूने फांद्या विखुरलेल्या राहतील, अशा मोजक्याच फांद्या ठेवाव्यात. जुन्या, वाळलेल्या, अनावश्यक आणि गर्दी करणाऱ्या फांद्या काढून टाकून सीताफळ बागेत भरपूर सूर्यप्रकाश व हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.

# लाल ऐवजी काळ्या टोमॅटोची शेती करा अन् मिळवा लाखोंचे उत्पन्न

काळ्या टोमॅटोची लागवड प्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाली. येथे तो इंडिगो रोज टोमॅटो म्हणून ओळखला जातो. तथापि, युरोपच्या बाजारपेठांमध्ये लोक याला सुपरफूड देखील म्हणतात. प्रत्येक शेतकऱ्याला टोमॅटो खायला आवडते. यामध्ये व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-ए आणि व्हिटॅमिन के मुबलक प्रमाणात आढळतात. याचे सेवन केल्याने अनेक प्रकारचे आजार बरे होतात. अशाप्रकारे, टोमॅटोचा वापर सौंदर्य उत्पादने बनवण्यासाठी देखील केला जातो, परंतु लोक बहुतेक टोमॅटो सॅलडच्या स्वरूपात खातात. लोकांना असे वाटते की टोमॅटोचा रंग फक्त लाल असतो, परंतु असे नाही. काळ्या रंगाचे टोमॅटोही आहेत. भारतातील अनेक राज्यांमध्ये याची लागवड केली जाते. विशेष म्हणजे लाल टोमॅटोप्रमाणेच काळ्या टोमॅटोचीही लागवड केली जाते. हिमाचल प्रदेशात शेतकरी काळ्या टोमॅटोची लागवड करत आहेत. त्याच्या बिया हिमाचल प्रदेशात परदेशातून आणल्या होत्या. यानंतर हळूहळू इतर राज्यातही काळ्या टोमॅटोची लागवड सुरू झाली.

हवामान : काळ्या टोमॅटोच्या लागवडीसाठी उष्ण हवामान चांगले मानले जाते. यासाठी मातीचे मूल्य ६ ते ७ च्या दरम्यान असावे. अशा परिस्थितीत भारतातील शेतकऱ्यांनी काळ्या टोमॅटोची लागवड करणे अधिक फायदेशीर ठरेल, कारण भारतातील हवामान उष्ण आहे. काळ्या टोमॅटोची किंमत लाल टोमॅटोपेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधव शेती करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात. पण, काळ्या टोमॅटोच्या झाडांना थोडी उशीरा फळे येतात. त्यामुळे शेतकरी बांधवांनी लागवड करताना थोडा संयम ठेवावा लागेल.

४ लाखांपर्यंत नफा मिळवू शकतो : काळ्या टोमॅटोची पेरणी हिवाळ्यात केली जाते. जानेवारी महिना त्याच्या लागवडीसाठी चांगला आहे. पेरणीनंतर तीन महिन्यांनी फळे येऊ लागतात. म्हणजे एप्रिल महिन्यापासून तुम्ही काळ्या टोमॅटोची काढणी करू शकता. जर शेतकरी बांधवांनी एक हेक्टरमध्ये काळ्या टोमॅटोची लागवड केली तर त्यांना ४ लाख रुपयांपर्यंत नफा मिळू शकतो, कारण त्याचा दर लाल टोमॅटोपेक्षा जास्त आहे. सध्या भारतात काळ्या टोमॅटोचा दर १०० ते १५० रुपये किलो आहे.



# हुरड्यासाठी ज्वारीच्या या वाणांची करा लागवड

हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो, कारण त्यावेळेस या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ल, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते. खास हुरडा पार्टी साठी गोडसर रसाळ आणि भरपूर दाणे असणाऱ्या जाती राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत.

हुरड्यासाठी ज्वारीच्या वाणांची नावे : खरीप लागवडीसाठी वाण - पीडीकेव्ही कार्तिकी (वाणी १०३), पीकेव्ही अश्विनी (वाणी ११/६).

रब्बी लागवडीसाठी वाण - फुले मधुर, एसजीएस ८-४, परभणी वसंत, ट्रॉम्बे अकोला सुरुची.

स्थानिक वाण : सुरती, गूळभेंडी, कुची कुची, काळी दगडी, वाणी, मालदांडी.

हुरड्याच्या वाणांची सविस्तर माहिती : १) एसजीएस-८-४ : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेला वाण. हुरडा रुचकर आणि गोड. हुरड्याची प्रत उत्तम, कणसातील दाणे सहजरीत्या वेगळे होतात. इतर हुरड्याच्या जातीपेक्षा याचा दाणा टपोरा. हुरडा उत्पादन १५ -१६ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ७०-७५ क्विंटल प्रति हेक्टरी. २) फुले उत्तरा : स्थानिक जातीतून निवड पद्धतीने विकसित. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात. सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड.



ताटे गोड असल्याने जनावरे कडबा चवीने खातात. कणीस गोलाकार, मध्यम घट्ट मध्यम उंचीचा, पाने पालेदार, खोड मध्यम, गोड रसरशीत. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. हुरडा उत्पादन २०-२५ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ५५-६० क्विंटल प्रति हेक्टरी. ३) फुले मधुर (आर एस एस जी व्ही -४६) : उत्कृष्ट प्रतीचा व चवदार हुरडा. खोड मध्यम, गोड, रसरशीत. वाण उंच व पालेदार जात. हुरडा अवस्था येण्यास ९३ ते ९८ दिवस लागतात. हुरडा अवस्थेत दाणे सहज सुटण्याचे प्रमाण हे ९५ टक्के पेक्षा जास्त. खोडमाशी किडीस, खडखड्या रोगास प्रतिकारक.

अवर्षणास प्रतिकारक. हुरड्याचे उत्पादन ३०-३५ क्विं./हे. कडब्याचे उत्पादन ६५-७० क्विं./हेक्टर. ४) सुरती : चवीला अत्यंत गोड, त्यामुळे मागणी चांगली. दाण्याचा आकार गोल. कणसांचा आकार थोडा वाकडा. या ज्वारीचे एकरी ५-७ क्विंटल उत्पादन निघते. शिवाय ६० क्विंटल पर्यंत हिरवा कडबा सुद्धा होतो. हा हुरडा ९० ते १०० दिवसांनी काढणीस येतो. ५) परभणी वसंत (पीव्हीआरएसजी १०१) : खाण्यास चवदार, गोड, मऊ. कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात. हुरड्याची अवस्था येण्यास ९५ दिवस. खोडमाशी, खोड कीड व खडखड्या रोगास सहनशील. दाण्याची आणि कडब्याची प्रत उत्तम. हुरडा उत्पादन ३४ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन १३३-१३५ क्विंटल प्रति हेक्टरी. मराठवाडा विभागासाठी शिफारस. ६) ट्रॉम्बे अकोला सुरुची (टी ए के पी एस -५) : मळणीस अतिशय सुलभ. हुरड्याची प्रत उत्तम, चवदार. हुरडा तयार होण्याचा कालावधी ९१ दिवस. हुरड्याचे उत्पादन ४३ क्विंटल. हिरवा चारा उत्पादन ११० क्विंटल. महाराष्ट्रासाठी प्रसारित. ७) पी डी के व्ही कार्तिकी (वाणी १०३) : हुरडा चवदार आणि गोड हुरडा ८२ ते ८४ दिवसात तयार होतो. मीज माशीच्या प्रादुर्भावाला बळी पडत नाही. हुरडा उत्पादन ४२ ते ४३ क्विंटल प्रति हेक्टर. विदर्भासाठी प्रसारित. ८) के व्ही अश्विनी ( वाणी ११/६) : ८२ ते ८४ दिवसात हुरडा तयार : हुरडा मळणीस सुलभ. हुरडा अधिक गोड व चवदार. दाण्यात साखरेचे प्रमाण अधिक. मीज माशी प्रतिकारक. हुरडा उत्पादन ४२-४३ क्विंटल प्रति हेक्टरी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

# मोकाट जनावरांना बंदोबस्त करा नसता कर भरणार नाही; व्यापाऱ्यांचा इशारा

जालना । प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालनाची मिटींग जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या मार्गदर्शनाखाली हॉटेल मधुबनच्या सभागृहात बैठक घेण्यात आली यावेळी बोलताना व्यापारी संघ म्हणाले. बैठकीचे उद्देश्य व प्रास्ताविक करताना बंब म्हणाले अनेक दिवसा पासून शहराच्या बाजार पैठेत मुख्य रसत्यावर मुकाट जनावर मोठ्या संख्येने बसलेले किंवा फिरत असतात त्याचे कोण वाली, माहित नाही. त्यामुळे शाळेचे विद्यार्थी, महिला, व्यस्कर इ. ना अनेक वेळा दुःखापत होत असते. हा जनतेचा सुरक्षेचा मोठा गंभीर प्रश्न आहे, हे जनावर गंदगी पण करीत आहे, वाहतुकीला सुध्दा अडथळा निर्माण होत आहे. चार चाकी, तीन चाकी वाहन चालविणे काय, दुचाकी सुध्दा चालविणे अवघड होत आहे. अनेक प्रभागात रस्त्यावर कचरेचे ढिग दिसुन येतात. नाले सुध्दा चोक-अप झाल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. जनतेचे आरोग्य धोक्यात आहे. ह्या वर्षी पाऊस फार कमी आहे.



थोडे फार पाऊस आल्यास दिवसात अनेक वेळा वीज नसल्यामुळे शाळेच्या विद्यार्थीच्या अभ्यासावर परिणाम होतो. सध्या आधुनिक तंत्रज्ञान, टेक्नोलॉजी, कॉम्प्युटर, उद्योग व्यवसाय, शासकीय कार्यालय सर्व काही वीज लाईट वर अवलंबुन आहे. वीज नसल्यामुळे सर्व ठप्प होऊन जाते. या कडे महावितरणने लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत चाललेली आहे. खंडणी, लुटमार, चोऱ्या-चपाट्या इ. पोलीस प्रशासन तर्फे रात्रीचा पेट्रोलियम अपुरी पडत आहे. दिवसा ढवळ्या सुध्दा घटना घडत आहे. जालना जिल्ह्याची ओळख व्यापारी वर्गामुळेच आहे. फुले मार्केटचा प्रश्न अनेक वर्षापासुन रखडलेला आहे. तेथे अतिक्रमण वाढत चालले आहे व शहरात, ग्रामीण भागात लहान मोठे उद्योग व्यवसाय करणारे जवळपास वीस हजार लोक आहे. कर भरण्यास आपला जिला आघाडीवर आहे. शासन, प्रशासन, महानगरपालिका, पोलिस अधिक्षक, जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी या समस्यावर लक्ष द्यावा, निवेदना देऊन ही, प्रश्न सुटत नाही. नागरी सुविधा सुरक्षा द्या, मुकाट - आवारा जनावरांना आवरा, शहर खड्डे मुक्त करा नसता आम्ही कर भरणार नाही व सेवाभावी संस्था आणि जनतेला सोबत घेऊन लोकशाही पध्दतीने आंदोलन उभारु असे बंब म्हणाले. महिला आघाडीची अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील म्हणाले बलात्कार, अनैतिक घटना वाढत चाललेली आहे. महिला सुरक्षित राहिल्यास समाज व देश सुरक्षित राहिल. व्यसनाधिनता मुळे अनेक कुटूंब उध्वस्त होत आहे. दारु-बंदी होणे आवश्यक आहे, असे सौ. मोहिते म्हणाल्या. सौ. आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी यांनी विचार मांडले. समीर जोशी, अक्षय घुगे यांनी उद्योग, गृह-उद्योग, महिला उद्योगसाठी अभ्यास दौरा बद्दल माहिती दिली. या बैठकीसाठी जगन्नाथ थोटे, विश्वास गाढे, तुळशीराम गिराम, राम मोहिते, विश्वनाथ हारेर, ॲड. अय्यर, द्वारका बजाज, सतिष अष्टेकर यांनी परिश्रम घेतले. मकरंद शहापुरकर यांनी डिजीटल अभियाना बद्दल माहिती दिली. बैठकीचे सुत्र संचालन सुदर्शन चिप्पा यांनी केले तर आभार प्रमोद जोशी यांनी मांडले. अभ्यास दौऱ्याचे पत्रक वितरण करण्यात आले.

## दहाफूट उंचीची पासष्ठ वृक्षची लागवड, शिवसेना शिक्षकसेनेचा उपक्रम



बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने दहाफुट उंचीचे पासष्ठ वृक्षाचे रोपण जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. शिक्षकसेनेच्या वतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस प्रेरणा वर्ष म्हणून साजरा होत आहे.

शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने आज बीड शहरातील पांगरी रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये जांभूळ, पळस, नांदूरकी, इंडियन ख्रिस्मस ट्री या सारखी उंच वाढणारी व परिपूर्ण वाढ झालेली दहा फुट उंचीची पासष्ट झाडे लावण्यात आली.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह राज्य शिक्षक सेनेचे विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, उपजिल्हा प्रमुख राजाभाऊ माहुवाले, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे महाराष्ट्रराज्य शिक्षकसेनेचे उपाध्यक्ष मा. दत्ताभाऊ पवार, मराठवाडा अध्यक्ष नामदेवरावजी सोनवणे , महाराष्ट्रराज्य तंत्रनिकेतन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रवींद्र दहाटे सर, शिवसेनेचे जेष्ठ सल्लागार व शिवसैनिक संभाजी गजले सर, शिक्षकसेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, संजय ढाकण, जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे, कार्याध्यक्ष आप्पा डोके, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वाघमारे वाघमारे, बीड तालुका अध्यक्ष उद्धवजी घोडके, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, राजाभाऊ हुरकुडे गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, सचिन साळुंखे सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## ग्रामीण कामांबाबत डॉ.योगेश क्षीरसागर यांची सीईओंशी चर्चा



बीड। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांची शुक्रवारी (दि.२५) भेट घेतली. या भेटीत बीड मतदारसंघातील ग्रामीण भागातील प्रलंबित आणि प्रस्तावित विकास कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ग्रामीण पाणीपुरवठा, रस्ते विकास, शाळांचे दर्जात्मक उन्नती, आरोग्य सुविधा आणि जिल्हा परिषदेमार्फत सुरू असलेल्या योजनांची अंमलबजावणी गतीमान करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. नागरिकांना तातडीने सुविधा मिळण्यासाठी प्रशासनाने अधिक सक्रियपणे काम करावे, अशी अपेक्षा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, विठ्ठल गुजर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सरपंच उपस्थित होते.

## बीडमध्ये गौरव महोत्सवाचे आयोजन
### साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीची जय्यत तयारी

बीड। प्रतिनिधी

साहित्य, सामाजिक न्याय आणि क्रांतीशील विचारसरणीचे प्रणेते साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात ''साहित्य सम्राट गौरव महोत्सव'' उत्साहात साजरा होणार आहे. हा भव्य महोत्सव मंगळवार, दि. २९ जुलैपासून १ ऑगस्टपर्यंत दररोज विविध कार्यक्रमांसह रंगणार आहे.डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव केवळ सण नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारा एक आदर्श ठरणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.

**असे होणार कार्यक्रम :** साहित्य सम्राट गौरव महोत्सवात, मंगळवार दि.२९ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता ५०० महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सभागृह मैदान चांदणे वाडा येथे संपन्न होईल. बुधवार दि.३० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता, सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे यांचा संगीत रजनी कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे होणार आहे. शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता साहित्य दिंडी, कर्नाटक वाद्य प्रमुख आकर्षण, त्यानंतर सकाळी १० वाजता अण्णाभाऊ साठे पुतळा येथे ध्वजारोहण, जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पार पडणार आहे. सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणूक निघणार आहे.

समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनील पाटोळे यांनी बीडमधील नागरिकांना या गौरव सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या काळात दरवर्षी प्रमाणे यंदाही साहित्य दिंडी, विचारगोष्टी, सांस्कृतिक कार्यक्रम आशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.अण्णाभाऊ साठेंच्या विचारांचा जागर घडवणारा आणि तरुण पिढीला प्रेरणा देणारा हा महोत्सव बीडकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, ''अण्णाभाऊंच्या कार्याचा व साहित्याचा गौरव करताना त्यांची सामाजिक जाण, श्रमिकांसाठीचा लढा आणि शोषितांसाठीची चळवळ नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा आमचा उद्देश आहे.'' त्यामुळे या साहित्यसम्राट गौरव महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांनी केले आहे.

## गरजु पन्नास विद्यार्थ्यांना मोफत शिकवणी
### जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा उपक्रम

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा शैक्षणिकदृष्टया आज ही मागास आहे. उच्च शिक्षणासाठी पर जिल्ह्याचा आधार घ्यावा लागतो ही शोकांतिक आहे, जिल्ह्यात विध्यार्थीरुपी गुणरत्नांची खान आहे. माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्थिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या परंतु मेडिकल अथवा इंजिनियरिंग ची तयारी करत असलेल्या अकरावी - बारावी च्या गरजु पन्नास विद्यार्थ्यांना मोफत वर्षभर शिकवणी देणार असल्याचा उपक्रम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाहीर केला.



शेकडो विध्यार्थी आजही इच्छा असुन शिकवणी पासून दुर आहेत. पालकांची बेरोजगारी, आर्थिक परिस्थिती नसणे या कारणांनी पाल्याची इच्छा असूनही नीट - जेईई च्या तयारी पासून लांब आहेत. अशा गरजु पन्नास विध्यार्थ्यांना राजस्थान कोटा येथील उच्चशिक्षित व प्रदीर्घ अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शना खाली संपूर्ण वर्षभर मोफत शिकवणी दिली जाणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.अशा गरजु विद्यार्थ्यांनी व पालकांनी ३१जुलै पर्यंत बीड शहरातील बस स्थानकामागे असणाऱ्या जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयाशी संपर्क साधुन पूर्व नोंदणी अर्ज भरून द्यावयाचा आहे. अधिक माहितीसाठी पालकांनी ९१५८९६३७३७ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

## वैद्यनाथ मंदिर प्रशासन ट्रस्टने स्थानिक लोकांसाठी दर्शनाची विशेष सोय करावी - ॲड. मनोज संकाये

परळी । प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी श्रावण महिन्यात स्थानिक नागरिकांची विशेष रांग करून सोय करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट यांच्याकडे केली आहे.

श्रावण महिना हा हिंदू धर्मानुसार पवित्र महिना म्हणून समजला जातो. या महिन्यामध्ये हजारोच्या संख्येने भाविक भक्त प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी परळी मध्ये दाखल होतात. बाहेर राज्यातील अनेक भाविक भक्त तसेच आजूबाजूच्या जिल्ह्यातील भाविक भक्त परळी मध्ये येत असतात. अनेक देवस्थान ट्रस्टने स्थानिक लोकांच्या दर्शनासाठी विशेष सोय केली आहे. या धर्तीवर वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टने देखील स्थानिक लोकांच्या दर्शनाची विशेष सोय करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. यावर्षी अनेक भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने वैद्यनाथाच्या परळी नगरी दाखल होण्याची दाट शक्यता आहे. बाहेर राज्यातील बहुतांश भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. परळी शहरातील व्यापारी वर्ग तसेच नोकरदार वर्ग दररोज प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येतो.मंदिर परिसरात जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. गर्दीमुळे स्थानिक लोकांचे दर्शन होत नाही. तसेच वैजनाथ ट्रस्टचे काही लोक स्थानिक लोकांची अडवणूक करतात असे निदर्शनास आले आहे. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. बाहेर राज्यातील तसेच आजूबाजूच्या जिल्ह्यातील मंदिरांमध्ये स्थानिक लोकांची दर्शनासाठी विशेष सोय करण्यात येते याचा विचार करून वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टने स्थानिक लोकांसाठी प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनास विशेष सोय करून सहकार्य करावे अशी विनंती त्यांनी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट कडे केली आहे.

## मोतिबिंदु मुक्त महाराष्ट्रासाठी लायन्सच योगदान;१०२ ग्रामस्थांची नेत्र तपासणी

जालना । प्रतिनिधी

लायन्स क्लब तर्फे अनेक वर्षापासून नेत्रसेवेचे कार्य सुरू असून मोफत शिबिरांच्या माध्यमातून आढळणाऱ्या मोतीबिंदु ग्रस्त रुग्णांवर उपचार केले जातात. महाराष्ट्र शासनातर्फे नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या मोतीबिंदु मुक्त महाराष्ट्र मोहिमेत लायन्स क्लबचे भरीव योगदान राहील. असा विश्वास लायन्स क्लब ऑफ जालनाचे अध्यक्ष राधेश्याम टिबडेवाल यांनी आज व्यक्त केला.

उज्जैनपुरी ता. बदनापुर येथे लायन्स क्लब ऑफ जालना, शिवसेना जालना जिल्हा आणि नाथ फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ( ता. २५) मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदु शिबीर घेण्यात आले. यावेळी प्रकल्प प्रमुख भाऊसाहेब घुगे, मिनाक्षी दाड,विजय दाड, कल्पना घुगे, क्लब चे सचिव राजेश खिस्ते ,अरूण मित्तल, डॉ. गिरीश पाकणीकर, कोषाध्यक्ष रतन बजाज, सरपंच संतोष सोरमारे,



उपसरपंच भिकाजी जाधव,माजी सरपंच जगन्नाथ शिंदे, सोसायटी चेअरमन बाजीराव शिंदे, रामेश्वर नागवे ,अमोल दाभाडे ,रामेश्वर दराडे, बाबासाहेब शिंदे, मनोज शिंदे, अण्णासाहेब शिंदे ,देवा ढाकणे, शरद घुगे ,विलास तुपे ,अर्जुन घुगे ,दादाराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गिरीश पाकणीकर यांनी माजी प्रांतपाल एम.जे.एफ.पुरुषोत्तम जयपुरिया यांच्या नेतृत्वाखाली दृष्टी रक्षक फिरते नेत्र तपासणी व्हॅन, परतूर येथे नेत्र रूग्णालय उपलब्ध झाले आहे. या माध्यमातून आतापर्यंत हजारो गरजूंना लाभ झाला, असे सांगून शिबीराविषयी सखोल माहिती दिली.

प्रांतीय सहसचिव तथा प्रकल्प प्रमुख मिनाक्षी दाड यांनी लायन्स क्लब मार्फत राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. सुत्रसंचालन सरपंच संतोष सोरमारे यांनी केले तर उपसरपंच भिकाजी जाधव आभार मानले.शिबीरात १०२ ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. पैकी ०८ कॅट्रक चे रूग्ण आढळून आले, त्यांच्यावर लायन्स च्या रुग्णालयात शस्त्रक्रिया केली जाईल असे प्रकल्प प्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी सांगितले.या वेळी महिला, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नाथ फाउंडेशन तर्फे सुविधा : भाऊसाहेब घुगे : लायन्स क्लब च्या नेत्र सेवा चळवळीत आपण सक्रिय सहभागी होणार असून बदनापुर तालुक्यात मोफत शिबीरे आयोजित केली जाणार आहेत. तसेच मोतीबिंदु ग्रस्त रुग्णांना शस्त्रक्रिया, येण्या- जाण्यासाठी सर्व सुविधा नाथ फाउंडेशनच्या माध्यमातून केली जाईल.असे प्रकल्प प्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी जिल्ह्यातील ५२ रूग्णालये संलग्न

### जिल्ह्यात ६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत

बीड। प्रतिनिधी

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १ जानेवारी ते ३० जून दरम्यान बीड जिल्ह्यात ६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे नोडल अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे यांनी दिली. राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या बीड येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत कार्यरत आहे.

वैद्यकीय मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नित जिल्ह्यातील ५२ रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात. संलग्नित रुग्णालयांची यादी पुढीलप्रमाणे.

बीड शहर : विठ्ठल हॉस्पिटल, लाईफ लाईन मल्टी स्पेशालिटी सर्जिकल हॉस्पिटल, कृष्णा हॉस्पिटल, सावळकर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संकल्प हॉस्पिटल, गुरुकृपा ॲक्सिडेंट हॉस्पिटल आणि डायग्नोस्टिक सेंटर, रेणू हॉस्पिटल, बार्शी रोड, हाके हॉस्पिटल, फोनिक्स क्रिटिकल केअर अँड सर्जिकल युनिट, दीप हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर युनिट, श्री माऊली हॉस्पिटल (क्रिटिकल सर्जिकल), साईबाबा हॉस्पिटल, ओम सर्जिकल हॉस्पिटल, जालना रोड, तुळशी क्लिनिक, यश हॉस्पिटल, बार्शी रोड, आनंद हॉस्पिटल, जालना रोड, वीर्यान हॉस्पिटल, देशमुख हॉस्पिटल, जालना रोड, श्री बाल रुग्णालय, जुने बीड, यशवंतराव जाधव स्मारक रुग्णालय आणि संशोधन केंद्र प्रा. लि., सुश्रुत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, स्पंदन हॉस्पिटल, नोबल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, ॲलन हॉस्पिटल, गौरी हॉस्पिटल, लाड बाल रुग्णालय, जीएसके हेल्थकेअर एलएलपी, जुने बीड, काकू नाना मेमोरिअल हॉस्पिटल, यशवंत मातृ रुग्णालय, योगीराज हॉस्पिटल आणि आयसीयू, लाईफ लाईन हॉस्पिटल, नगर नाका, जीएसके हेल्थ केअर एलएलपी, महिला कॉलेज रोड, नवीन बीड, नीरा बाल रुग्णालय, डी.पी. रोड, फोनिक्स क्रिटिकल केअर आणि सर्जिकल युनिट, जालना रोड, घोलवे हॉस्पिटल, भाग्य नगर, सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर युनिट, डी.पी. रोड, आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, महानंदा हॉस्पिटल, श्री बाल रुग्णालय, जनाई बाल रुग्णालय, श्री नारायणी चाइल्ड केअर युनिट, वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, संजिवनी हॉस्पिटल आणि क्रिटिकल केअर

परळी वैजनाथ : श्रीकृष्ण ॲक्सिडेंट हॉस्पिटल, कराड हॉस्पिटल, श्री समर्थ हॉस्पिटल, अंबाजोगाई : आशा इंटेन्सिव्ह केअर युनिट आणि रिसर्च सेंटर, माजलगाव : शतायुषी फाउंडेशन, यशवंत हॉस्पिटल अँड क्रिटिकेअर, आष्टी : शेंडगे हॉस्पिटल, कडा, गेवराई : आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर


## तहसीलदार यांच्या हस्ते श्रावण मासचा पहिला अभिषेक



अंबड । प्रतिनिधी

२५ जुलै रोजी श्री मत्स्योदरी देवी संस्थान अंबड श्रावण मास चा पहिला अभिषेक संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण सहपत्नी सोनाली चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच संस्थान परिसरातील परस बागा मध्ये बेल,आंबा,अशोक, लिंब, कडीपत्ता अशा नाना प्रकाराची झाडे लावण्यात आली. यावेळी संस्थान विश्वस्त तथा पुजारी श्री गीता विलास कुंटेफळकर, संस्थान आचार्य श्री संतोष दुधधारी,संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे , संतोष देवा यांचे १४ पुरोहित ,संस्थान चे गुरव सुहास गुरव संस्थान कर्मचारी नामदेव राठोड, गोविंद कायस्थ, दिगंबर खरात आणि अर्जुन शिंदे यावेळी हे होते

# राज्यातील धोकादायक शाळा इमारतीचे सर्वेक्षण केले जाणार



**मुंबई । प्रतिनिधी**

**राजस्थानच्या झालावाडमध्ये मुसळधार पावसामुळे मनोहरठाणा परिसरातील पिपलोदी गावातील उच्च प्राथमिक शाळेच्या जुन्या इमारतीचे छत अचानक कोसळून दुर्घटना घडली. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने शाळांच्या इमारतींबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता महत्त्वाची असल्याने राज्यातील बाकी धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने राज्यातील शाळा इमारत सुरक्षिततेसाठी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी तातडीने बैठक घेतली. मंत्रालयात झालेल्या या बैठकीस प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव समीर सावंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, समग्रचे प्रकल्प संचालक संजय यादव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि राज्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींची तपासणी करून त्यांची बांधकामे नव्याने करण्यासाठी सर्व्हे करून सर्वसमावेशक आराखडा तयार करावा. तसेच धोकादायक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम ठरवून जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

### शाळा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट

राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले, आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिक क्षेत्रातील शाळा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिटही करावे. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करावा. शाळांमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.

# संयमी नेतृत्व

**मा.पंकजाताई मुंडे...महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा..एक दमदार, कणखर, आक्रमक व तितक्याच संयमी.. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम राजकीय वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात असताना राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेलं हे उमदं व्यक्तीमत्व.. समाजातील वंचित, पिडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करण्याचा ध्यास घेत, येणा–या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारं हे धुरंधर नेतृत्व आज सर्व सामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे.**



पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी- अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं आणि करत आहेत. महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन्? प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते. पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यां मध्ये आहे. लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणत, ज्यांचा कुणी वाली नाही, ज्यांची कुणी वाणी नाही अशा लोकांसाठी मी आहे, अगदी तोच आदर्श आणि तेच संस्कार पुढे घेऊन पंकजाताई राजकारण व समाजकारणात वाटचाल करत आहे. पंकजाताई हया जरी मुंडे साहेबांची लेक, त्यांच्या राजकीय वारसदार असल्या तरी आज राजकारणात त्यांनी जे स्थान निर्माण केले आहे, ते केवळ आपल्या स्वकर्तृत्वावर.., हे विसरून चालणार नाही. पद अथवा सत्ता असो वा नसो, त्यांचं संघटना आणि सामान्य जनतेसाठी असलेलं काम अव्याहतपणे सुरूच असतं. २०१९ ला विधानसभेत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले पण त्या खचल्या नाहीत, पुन्हा तितक्याच नव्या जोमाने कामाला लागल्या, संघटन कार्यात स्वतःला झोकून दिले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बीडमधून त्यांना उमेदवारी मिळाली. इथे विरोधकांकडून अफाट जातीपातीचा विखारी प्रचार झाला, त्यातही त्यांनी कडवी झुंज दिली पण निसटता पराभव झाला. त्यानंतर आलेल्या विधानसभा निवडणुकीत हक्काचा परळी मतदारसंघ सुटला, पण न खचता त्या पक्षासाठी पुन्हा जोमाने कामाला लागल्या आणि जवळपास चाळीस मतदारसंघात त्यांनी भाजपचे आमदार निवडून आणले. तहान भूक विसरून पक्षासाठी दिवसरात्र काम करताना स्वतःच्या आरोग्याकडेही त्यांनी लक्ष दिले नाही. शेवटी पक्ष नेतृत्वाला सुध्दा त्यांच्या कष्टाची दखल घेणे भाग पडले, त्यांना विधानपरिषदेवर संधी मिळाली. पुढे लगेच काही दिवसांनी भाजप महायुतीची सत्ता आली आणि त्यांना कॅबिनेट मंत्री पद मिळाले. संघटनेप्रती असलेली निष्ठा, अपार कष्ट करण्याची तयारी हे त्यांचं कर्तृत्व खरोखरच वाखाणण्यासारखं आहे.

**मिळालेल्या प्रत्येक संधीचं सोनं**

पंकजाताईंना कोणतेही खाते मिळो, त्यात त्या अभ्यासूपणाने त्याचं सोनं करतातच, हे यापूर्वी देखील सिध्द झाले आहे. सामान्य जनतेशी फारसा थेट संबंध नसलेलं, कमी बजेटच पर्यावरण व पशुसंवर्धन खातं त्यांना मिळालं पण त्यातही जबरदस्त काम करून त्यांनी आपला ठसा उमटवला. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य त्यांनी केलं. पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा धाडसी निर्णय, मेंढपाळांच्या थेट खात्यात चराई अनुदान,परळी-बारामतीत पशुवैद्यकीय महाविद्यालय, नो प्लास्टिक मोहीम, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात बदल करून शेतीसाठी ई वाहन, वसुंधरा बचाव अभियान आदी महत्वाचे निर्णय त्यांनी मंत्रीपदाच्या केवळ सहा महिन्यांत घेतले, त्यांचं नियोजनबद्ध आणि गतिशील कामाचे यापेक्षा दुसरे उदाहरण काय असू शकेल. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पंकजाताई मुंडे यांच्या लढावू बाण्याचे दर्शन सभागृहाला झाले. एकच विषय घेवून विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून त्यांचेवर प्रश्नांची चौफेर सरबत्ती करण्यात आली पण त्यांनी अशी काही खिंड लढवली की, त्यांनी दिलेल्या उत्तराचे उपसभापतींनी देखील जाहीर कौतुक केलं, ही खरं तर त्यांच्यातील अभ्यासू गुणांची चुणूक म्हणावी लागेल.

**नेता मिळे आम्हा ऐसा, मग काय असे उणे..!**

पंकजाताईंच नेतृत्व सर्वांनाच हवहवसं वाटणार असं आहे. लोकसभेत निसटता पराभव झाल्यानंतर त्यांचे समर्थक सैरावैरा झाले. त्यांचा पराभव जिव्हारी लागल्याने पाच तरूणांनी स्वतःचा जीव दिला. या घटनेने त्यांना खूप वेदना झाल्या, त्यांनी या तरूणांच्या परिवाराची भेट घेऊन त्यांना मायेचा आधार दिला. मध्यंतरी गेवराई तालुक्यात एका तांड्यावरील ऊसतोड मजूर दाम्पत्य अपघातात मृत्यूमुखी पडले, त्याच्या कुटूंबाचाही त्या आधार बनल्या. बीड मधील भाजपचे विस्तारक बाबासाहेब आगे यांची हत्या झाल्यानंतर त्याही परिवाराच्या मदतीला त्या धावल्या. सामान्य माणूस असो की कार्यकर्ता प्रत्येकाला आपलं वाटणार त्यांच नेतृत्व आहे, वंचितांच्या या माऊलीला सर्वांनी जपावं. पंकजाताईचे नेतृत्व भविष्यात एका मोठ्या उंचीवर जावं ही प्रत्येकाची इच्छा आहे. गोरगरीब, सामान्य माणसाचे आशीर्वाद त्यांच्या पाठिशी असल्याने ही इच्छा नक्की पूर्ण होईल यात तीळमात्र शंका नाही...

**प्रदीप कुलकर्णी**

# बालरंगभूमी परिषदेतर्फे साजरा होणार ‘मराठी बालनाट्य दिवस’

## २ ऑगस्ट रोजी बीडमध्ये दोन बालनाट्य प्रयोगांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**मराठी बालरंगभूमीला ६६ वर्षांची समृद्ध परंपरा लाभली असून, त्याच्या गौरवासाठी दरवर्षी २ ऑगस्ट हा दिवस ‘मराठी बालनाट्य दिवस’ म्हणून साजरा केला जातो. यंदाही बालरंगभूमी परिषद बीड शाखेच्या वतीने या दिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, दोन बालनाट्य प्रयोग सादर होणार आहेत, अशी माहिती बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी दिली.**




बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची संलग्न संस्था असून, महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये बालनाट्य दिन विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. बीडमध्ये या दिवशी ‘अदींबाच्या बेटा’ आणि ‘परीचं स्वप्न’ ही दोन बालनाट्ये सादर केली जाणार आहेत. ‘अदींबाच्या बेटा’ हे नाटक धनंजय सरदेशपांडे लिखित व रवी धोतडमल दिग्दर्शित असून, ते जीनियस इंग्लिश स्कूल, बीडचे विद्यार्थी सादर करणार आहेत. तर ‘परीचं स्वप्न’ हे नाटक रोहित पुराणिक यांनी लिहिले व दिग्दर्शित केले असून, आर्ट ऑफ फन अकॅडमी, गेवराईच्या विद्यार्थ्यांकडून सादर होणार आहे. हे दोन्ही प्रयोग २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमाला शहरातील बालकलावंत, पालक, शिक्षक आणि बालप्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर, कार्यवाह डॉ. संजय पाटील देवळाणकर यांच्यासह स्नेहल पाठक, अनुराधा चिंचोलकर, विलास सोनवणे, मिलिंद शिवनीकर, अमित गाढे, अनिता शिंदे, डी. डी. रामटेके, विजय राख, असलम शेख, दीपक गिरी, रोहित पुराणिक, रवी धोतडमल, पल्लवी कुलकर्णी-देशपांडे, दीपक जमदाडे आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### “ मराठी बालनाट्य दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी

२ ऑगस्ट १९५९ रोजी रत्नाकर मतकरी लिखित आणि सुधा करमरकर दिग्दर्शित ‘मधुमंजिरी’ या बालनाट्याचा पहिला व्यावसायिक प्रयोग झाला. याच दिवशी बालनाट्य चळवळीची औपचारिक सुरुवात झाली. या नाटकाच्या निमित्ताने सुधा करमरकर यांनी ‘लिटिल थिएटर’ या संस्थेची स्थापना केली बालरंगभूमीवरील पहिले व्यावसायिक बालनाट्य, लिटिल थिएटरची स्थापना आणि या चळवळीच्या प्रारंभाचा त्रिवेणी संगम यानिमित्ताने २ ऑगस्ट हा ‘मराठी बालनाट्य दिवस’ म्हणून साजरा केला जातो.



# भालेकर कुटूंबाला आर्थिक मदत

**परतूर । प्रतिनिधी**

शेतात काम करत असताना विजेचा शॉक लागून संदीप रामभाऊ भालेकर यांचे निधन झाले. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जालना जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी भालेकर कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. कपिल आकात यांनी शोकाकुल कुटुंबियांना आधार देत तातडीची मदत म्हणून रु. २१,००० रु आर्थिक मदत दिली. या कठीण प्रसंगी ते म्हणाले की, ‘‘शेतकऱ्यांचे आयुष्य किती कठीण आहे हे अशा घटनांमधून वारंवार समोर येते. मृतांच्या कुटुंबाला या दुःखातून सावरण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. भालेकर कुटुंबियांसोबत संवाद साधताना आकात यांनी शासनदरबारी योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही दिले. या भेटीप्रसंगी अनेक स्थानिक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये स्व.संदीप यांचे वडील रामभाऊ भालेकर, माजी नगराध्यक्ष विनायक आप्पा काळे, माजी नगरसेवक अंकुशराव तेलगड, विजय राखे, अखिल काजी , सिद्धार्थ बंड, अंकुश भालेकर यांचा समावेश होता.

# मराठी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी मोरे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना येथील पत्रकार अच्युत मोरे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नांदेड येथील विभागीय बैठकीत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत आणि राज्य सरचिटणीस सुजाता खानोरे यांच्या स्वाक्षरीचे नियुक्ती पत्र देऊन मोरे यांच्यावर जालना जिल्ह्याची जबाबदारी सोपविण्यात आली.**




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे बोलविण्यात आलेल्या विभागीय बैठकीत पत्रकारांच्या विविध समस्यावर चर्चा करण्यात आली. दरम्यान जालना येथील पत्रकारांसाठी घरकुल योजना राबविण्याचा मनोदय प्रदेशाध्यक्ष मनीष केत यांनी बोलून दाखविला. आगामी काळात पत्रकार संघाची ध्येयधोरणे राबवणे, दरवर्षी नवीन सभासद नोंदणी करणे, शहर, जिल्हा कार्यकारणीचे पदाधिकारी नियुक्त करणे, जिल्हातील सर्व तालुका अध्यक्ष नेमणूक करून कार्यकारणी तयार करणे यासह पत्रकार संघाची कामे प्राधान्याने करावीत. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कायम अग्रेसर राहिला आहे. त्यासाठी जालना जिल्ह्यातील पत्रकार आणि पत्रकारितेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या, विविध मागण्या यासाठी काम करावे असे नियुक्तीपत्रात म्हटले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, मराठवाडा अध्यक्ष रुपेश पाडमुख, नांदेड जिल्हाध्यक्ष श्रीधरराव नागापुरकर, परभणी जिल्हाध्यक्ष रमेश नाटकर, हिंगोली जिल्हाध्यक्ष आय. डी. पठाण, जालना जिल्हाध्यक्ष अच्युत मोरे यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थिती होती.

# कमी झोपेमुळे होतात ‘या’ पाच गंभीर समस्या–डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**आजच्या धावपळीच्या जीवनात झोपेला अनेक जण महत्त्व देत नाहीत. कामाचा ताण असो किंवा रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरणे, अनेक लोकांची पुरेशी झोप होत नाही; पण झोपेची कमतरता तुमच्या शरीरासाठी किती धोकादायक ठरू शकते, हे तुम्हाला माहीत आहे का? विशेषतः वृद्धांसाठी कमी झोप अनेक गंभीर आजारांना आमंत्रण देऊ शकते. झोपेच्या कमतरतेमुळे कोणत्या ५ गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात, हे जाणून घ्या.**



हृदय : पुरेशी झोप न घेतल्याने हृदयावर थेट परिणाम होतो. झोपेच्या कमतरतेमुळे रक्तदाब वाढू शकतो. परिणामी, हृदय आणि रक्तवाहिन्यांवर जास्त दाब येतो. दीर्घकाळ असे झाल्यास हार्ट अटॅक आणि स्ट्रोक यांचा धोका खूप वाढतो. वृद्धांमध्ये आधीपासूनच हृदयविकार होण्याची शक्यता जास्त असल्याने झोपेची कमतरता त्यांच्यासाठी अधिक धोकादायक ठरू शकते.

**मधुमेह :** झोपेची कमतरता शरीराच्या ग्लुकोज हाताळण्याच्या क्षमतेवर परिणाम करते. तुम्ही पुरेशी झोप घेत नाही तेव्हा तुमचे शरीर इन्सुलिनला कमी प्रतिसाद देते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. ही स्थिती हळूहळू टाईप - २ मधुमेह होण्यास कारणीभूत ठरू शकते. वृद्धांमध्ये चयापचय क्रियामंद असल्याने हा धोका आणखी वाढतो.

**मानसिक आरोग्य :-** झोपेच्या कमतरतेचा आपल्या मानसिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. पुरेशी झोप न घेतल्याने ताण, चिंता आणि नैराश्य यासारख्या समस्या वाढू शकतात. याचा स्मरणशक्ती आणि एकाग्रतेवरही परिणाम होतो. वृद्धांमध्ये एकटेपणा आणि सामाजिक अलिप्तता जाणवण्याची शक्यता असते. झोपेची कमतरता या नकारात्मक भावनांना आणखी वाढवू शकते.

**रोगप्रतिकारकता :** झोपेच्या वेळी आपले शरीर सायटोकाईन्स नावाचे प्रोटिन तयार करते आणि ते सूज आणि संक्रमणांशी लढण्यास मदत करतात. आपल्याला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा या संरक्षक सायटोकाईन्सचे उत्पादन कमी होते आणि रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. वृद्धांची रोगप्रतिकारशक्ती नैसर्गिकरीत्या कमकुवत असते. त्यामुळे झोपेची कमतरता त्यांना संक्रमणांसाठी त्यांना संक्रमणांसाठी अधिक संवेदनशील बनवते.

**वजन वाढ :** झोपेची कमतरता आपल्या भुकेवर नियंत्रण ठेवणाऱ्या हार्मोन्सनादेखील प्रभावित करते. कमी झोप घेतल्याने घ्रेलिन या भूक वाढवणाऱ्या हार्मोनची पातळी वाढते आणि लेप्टिन या भूक कमी करणाऱ्या हार्मोनची पातळी कमी होते. यामुळे जास्त भूक लागते आणि अनावश्यक खाण्याची सवय लागते. परिणामी, लठ्ठपणा वाढण्याचा धोका असतो. वृद्धांमध्ये शारीरिक हालचाली कमी असल्याने ही समस्या अधिक गंभीर होऊ शकते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# स्वाभिमानी, कणखर आणि संयमी लोकनेत्या–पंकजाताई मुंडे

**महाराष्ट्राचा राजकीय इतिहास हा लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात आज मुंडे नावाचा जो दबदबा आहे तो केवळ गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळेच त्यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचा आवाज होत एक नारा दिला. ‘‘मी मोडेन पण वाकणार नाही, मरेन पण कोणासमोर झुकणार नाही‘‘ यातून त्यांनी सर्वसामान्य जनतेला स्वाभिमानाने जगण्याची जाणीव करून दिली. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या अकाली निधनानंतर पुढे पंकजाताई मुंडे यांनी त्यांचा वसा आणि वारसा समर्थपणे चालवत त्या सर्वसामान्य पीडितांचा, वंचितांचा आवाज बनल्या. आणि त्यांनी आजही महाराष्ट्राच्या राजकारणात मुंडे नावाचा दबदबा कायम ठेवला. पंकजाताईंची राजकीय ताकद, आक्रमक शैली आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारे लोकनेतृत्व, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा असणारा मोठा पाठिंबा, वंचित, पीडित घटकांसाठी त्यांची काम करण्याची असलेली तळमळ याची प्रचिती महाराष्ट्रातील जनतेला वारंवार येत आहे. स्वाभिमानी आणि कणखर बाणा तसेच प्रसंगी संयम यामुळे त्यांची राजकारणात एक वेगळी प्रतिमा आहे.**

पंकजाताई मुंडे.... महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा.... स्वाभिमानी, दमदार, कणखर, प्रसंगी संयमी आणि आश्वासक लोक नेतृत्व म्हणून आज त्यांच्याकडे पाहिलं जातं. पंकजाताई म्हणजे स्वाभिमानाचा जागर. त्या जेव्हा बोलतात, तेव्हा फक्त भाषण होत नाही; तो एक आत्मविश्वास असतो, जो त्यांच्या शब्दांमधून, देहबोलीतून आणि ठाम मतांमधून झळकतो. ग्रामीण भागातील महिला असोत, युवा कार्यकर्ते असोत किंवा सामाजिक कार्यकर्ते प्रत्येकाला त्या आपल्यातल्या एक वाटतात. समाजातील वंचित पीडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले त्या मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास घेत, येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे स्वाभिमानी, कणखर, धुरंदर लोकनेतृत्व आज सर्वसामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे.

स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांनी २००९ ला लोकसभेची निवडणूक लढवल्यानंतर २००९ ची विधानसभा निवडणूक परळी मतदारसंघातून लढवत पंकजाताई या सक्रिय राजकारणात आल्या. पुढे २०१४ साली स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या अकाली निधनानंतर या दुःखातून स्वतःला, कुटुंबाला आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मुंडे परिवारावर प्रेम करणाऱ्या जनतेला सावरत, आधार देत महाराष्ट्रात पुन्हा एकदा संघर्ष यात्रेचा नारा देऊन ‘‘संघर्ष यात्रा‘‘ काढली आणि हीच संघर्ष यात्रा पुढे भारतीय जनता पार्टी व महायुतीला सत्तेपर्यंत घेऊन जाण्यास मदत झाली. त्यांनी २०१४ ला पुन्हा परळी मतदारसंघातून विधानसभेवर विजय मिळवला. त्यावेळी भारतीय जनता पार्टी व महायुतीची सत्ता आली आणि महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात त्यांना प्रमुख पदावर स्थान देण्यात आले. पंकजाताई मुंडे यांनी मंत्रीपदाची जबाबदारी घेतल्यानंतर जलसंधारण, ग्रामविकास आणि महिला व बालकल्याण विभाग यांसारख्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्यांच्या कार्यकाळात जलयुक्त शिवार, महिला



सक्षमीकरण अधिक क्षेत्रात त्यांनी शाश्वत व भरीव कार्य केले. पुढे २०१९ झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्या पराभवानंतर त्यांनी त्याची चिकित्सा व चिंतन करून परभावानं न खचता, कोणालाही दोष न देता पुन्हा कार्याला सुरुवात केली त्यावेळी पक्षान त्यांना राष्ट्रीय सचिव व मध्य प्रदेशाच्या सह प्रभारी पदाची जबाबदारी दिली. ती देखील त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. पक्षांतर्गत आलेल्या राजकीय आव्हानांनाही पंकजाताईंनी सन्मानाने आणि संयमानं सामोरं गेल्या. मंत्रीपद गेलं, तरी पक्षकार्य थांबलं नाही. त्या सातत्याने जनतेमध्ये राबत राहिल्या आणि संघटनात्मक पातळीवरही सक्रिय राहिल्या. २०१९ पासून महाराष्ट्राचे राजकारण ज्या दिशेने जात आहे ते सामान्य माणसाला खटकणार आहे. २०२२ च्या राजकीय घडामोडीनंतर महाराष्ट्रात सामाजिक घडामोडीही घडल्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पुरोगामी महाराष्ट्रात जाती - पातीच्या राजकारणाची पेरणी करून सदरील निवडणुक ही विकासाच्या, कामाच्या मुद्द्यावर न जाता जातीच्या मुद्द्यावर अनेक ठिकाणी महाराष्ट्रात लढत झाली. यावेळी बीड लोकसभेची निवडणूक ही पक्षान पंकजाताई यांना लढवण्यास सांगितली. ही निवडणूक महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आतापर्यंत कधी नव्हे त्या वेगळ्याच वळणावर गेली होती. सदरील निवडणूक प्रचारावेळी पंकजाताईंनी अतिशय संयमाची प्रसंगी रोख - ठोक भूमिका घेत त्यांनी स्वतःचे ठाम मत जनतेपर्यंत पोहोचवले. या निवडणुकीत अगदी अल्पशा मतान पंकजाताईंचा पराभव झाला. सदरील पराभव कार्यकर्त्यांनी एवढा मनाला लावून घेतला की पंकजाताई च्या पराभवामुळे बीड मतदार संघातील आणि महाराष्ट्रातील पाच ते सहा तरुणांनी आत्महत्या केली. त्यावेळी सदरील कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी गेलेल्या कणखर पंकजाताई देखील शांत झाल्या आणि कुटुंबाची अवस्था पाहून सांत्वन करण्यासाठी गेलेल्या पंकजाताई यादेखील कुटुंबीयांसमवेत अगदी ढसाढसा रडल्या. सदरील घटना घडल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील आणि मतदारसंघातील तरुणांना स्वतःची शपथ घालून असा निर्णय न घेण्याची विनंती केली. नेत्याच्या प्रभावानंतर कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्याचं हे महाराष्ट्रातील कदाचित एकमेव उदाहरण असेल. प्रभावानंतर महाराष्ट्रातील जनतेचे प्रेम आणि पंकजाताईंचं लोक नेतृत्व पाहून पक्षान त्यांना विधान परिषदेवर घेत पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन या मंत्रिपदावर कार्य करण्याची संधी दिली. त्यांची भाषणशैली प्रभावी, मुद्देसूद आणि थेट असते. प्रत्येक सभेमध्ये त्या आपला भावनिक आणि व्यावहारिक दृष्टिकोन मांडतात, जो जनतेच्या मनात थेट पोहोचतो. ग्रामीण भागातील महिला, शेतकरी, ऊसतोड मजूर, पीडित, वंचित, यांच्यासाठी त्या नेहमीच लढत राहिल्या आहेत. त्यांच्यातील स्वाभिमान, जिद्द, प्रसंगी कणखरपणा आणि आत्मविश्वास यामुळे त्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरतात. राजकारण ही केवळ सत्तेची शर्यत नसून सेवेचं माध्यम असू शकतं, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं. पंकजाताईंमध्ये एक विकासदृष्टिकोन, सामाजिक जाणिवा, आणि सामंजस्यपूर्ण नेतृत्व आहे. त्या भविष्यात महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतील, याबाबत शंका नाही. त्यांची कार्यतत्परता, स्पष्टवक्तेपणा आणि जनतेशी नातं टिकवण्याची ताकद त्यांना स्वाभिमानी, कणखर आणि संयमी लोकनेत्या म्हणून अधोरेखित करते. पंकजाताई म्हणजे गोपीनाथराव मुंडेंच्या स्वप्नांची जिवंत साक्ष. त्या केवळ राजकीय वारसदार नाहीत, तर मातीतून उगम पावलेल्या जनतेच्या स्वाभिमानाची प्रेरणा आहेत. त्यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देताना एवढंच म्हणावंसं वाटतं

**‘‘स्वाभिमान जपणाऱ्या महाराष्ट्राला, पंकजाताईंचा नेहमीच अभिमान आहे!‘‘**

**अमोल तांदळे**
**चौसाळा (बीड)**
**मो.९४२००३२४३३**

# काळेवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बहिरट यांच्या कार्यध्दतीवर प्रश्नचिन्ह

## पोलीस आयुक्त लक्ष देणार का, वैष्णवी हगवणे सारखं प्रकरण होण्याची वाट बघणार?

**पुणे । प्रतिनिधी**

**अन्याय अत्याचार होतात तेव्हा संरक्षण आणि सुरक्षेची हमी या आशेवर पोलिसांची मदत घेतली जाते परंतु पोलिसाचं टोलवाटोलीची उत्तरे देऊन अन्याय करणारालाच मदत करत असतील तर न्याय मागायचा कोणाकडे काळेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असेच काहीसे प्रकार सुरू आहेत येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे सामान्यांना कायद्याचा बडगा दाखवला जातो मात्र रात्रभर चालणारे बार हॉटेल्स आणि इतर उद्योगाकडे मात्र अर्थ दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा आहे अशा अधिकाऱ्याच्या बाबतीत पोलीस आयुक्त लक्ष देणार का अशी देखील चर्चा आता पिंपरी चिंचवड आणि काळेवाडी भागामध्ये होत आहे.**

राज्यभरात गाजलेल्या वैष्णवी हगवणे हे प्रकरण होऊन काही काळ उलटला त्यातचं आता काळेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहाटणी परिसरातील एका पीडित तिच्या सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते आणि याबाबत पोलिसांना माहिती असताना या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांना मात्र न्याय देण्याची भूमिका घेता येत नसेल तर अशा अधिकाऱ्याचा उपयोग काय पोलिसांच्या नाहक भीतीमुळे तक्रार दाखल केली मात्र आरोपींना अटक करण्याऐवजी आरोपींनाच पाठीशी घालण्याचा प्रकार केला जात असल्याचे दिसून येत आहे महिला सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकारांनी त्या पीडित महिलेला न्याय देण्याची भूमिका घेतली मात्र बहिरट यांनी केवळ पुरवणी जवाब मध्ये नणंद तिच्या नवऱ्याकडून झालेला शारीरिक व मानसिक अत्याचार




अश्लील भाषेमध्ये केलेली शिवीगाळ याचीच दखल घेतली केवळ महिलेला न्याय मिळावा म्हणून सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार पुढे आले याचा राग मनात धरून पोलीस अधिकारी राजेंद्र बहिरट यांनी पत्रकारांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना एकेरी भाषा आणि अरेरावी वापरून अवमानित केले जर पोलीस पिढीतला न्याय देत नसेल तर सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांची भूमिका न्यायाची असली पाहिजे या सोबतच पोलिसांची भावना देखील न्यायचीच असावा मात्र जेव्हा पोलीस चुकीच्या पद्धतीने चौकशी आणि वागत असतील तर त्यांनाही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी समज देणे गरजेचे आहे प्रामुख्याने काळेवाडी आणि पिंपरी चिंचवड भागामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे अवैध व्यापार सुरू आहेत याकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक सार्वजनिक कार्यक्रम विशेषतः जयंती असतात अशावेळी मात्र हेच पोलीस निरीक्षक कायद्यानुसार नियमावर बोट ठेवतात मात्र या परिसरात अहोरात्र चालणारे अनाधिकृत बार, हॉटेल ,अवैध धंदे ,बनावट दारू, मटका जुगार, पत्त्याची क्लब ,अवैध्य वाहतूक याच्यावर मात्र कारवाई करताना कोणीही पुढे येत नाही मग अशा प्रकरणांमध्ये हे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मूग गिळून गप्प बसतात आणि अशा मुळेच गुन्हेगारी देखील वाढताना दिसत आहे ज्यांना कायद्याची भीती वाटत नाही असे भर रस्त्यावर नको ते उद्योग करताना दिसत आहेत याला पोलीस जबाबदार आहेत असेच म्हणावे लागेल गुन्हेगारावर वचक नाही त्यामुळे गुन्हेगारी वाढत आहे आणि यामुळेच सर्वसामान्य नागरिकांत असुरक्षिततेची भावना वाढीस लागू लागली आहे आता या सर्व घटनेमध्ये एका पीडित महिलेला न्याय देण्याऐवजी सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनाच आरेरावी आणि एकेरी भाषेचा वापर होत असेल तर सर्वसामान्यांनी न्याय कोणाकडे मागावा हा मोठा प्रश्न आहे तेव्हा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांनी अशा पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# 'पुनीत बालन ग्रुप'तर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व ग्रंथालय

**पुणे । प्रतिनिधी**

**पुनीत बालन ग्रुप'च्यावतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी शहरात सुसज्ज अभ्यासिका व ग्रंथालय बांधण्यात येणार आहे. शोभा रसिकशेठ धारिवाल यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या या अभ्यासिका व ग्रंथालयाचे भूमिपूजन 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष पुनीत बालन यांच्याहस्ते करण्यात आले. यामुळे शहरातील गरजू विद्यार्थ्यांना हक्काची अभ्यासिका व ग्रंथालय उपलब्ध होणार आहे.**

शिक्षण, क्रिडा, वैद्यकीय, अध्यात्मिक आदी विविध क्षेत्रात 'पुनीत बालन ग्रुप'चे कार्य हे उल्लेखनीय असे आहे. त्यांच्या या कामाचे क्षेत्र केवळ





पुणे शहरापुरते मर्यादित नाही तर या कामाचा विस्तार काश्मिरपर्यंत झालेला बघायला मिळतो. पुणे हे तर राज्यातील शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. याठिकाणी शिक्षणाच्या दृष्टीने राज्याच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येत असतात. परंतु अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासिका व ग्रंथालयाचे भरमसाठ शुल्क भरणे शक्य होत नाही. या विद्यार्थ्यांनाही चांगले शिकून मोठे होण्याचे स्वप्न साकार करता यावे या दृष्टीने 'पुनीत बालन ग्रुप'ने पुढाकार घेतला आणि पुण्यात अशा गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व ग्रंथालय बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार श्री वृध्देश्वर-सिध्देश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट मंदिर परिसरात ७ हजार ५०० चौ. फुट इतकी प्रशस्त अशी दुमजली अभ्यासिका व ग्रथालय बांधण्यात येणार असून या बांधकामाचे भूमिपूजन पुनीत दादा बालन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आर्किटेक्ट शिरीष केंभावी, श्री वृध्देश्वर-सिध्देश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष हनुमंतराव बहिरट-पाटील, सचिव सुधीर दुर्गे, खजिनदार शशिकांत भोसले, विश्वस्त संजय सातपुते आणि वृद्धेश्वर चौपाटीचे लाला गायकवाड उपस्थित होते.

# सोशल मीडियाने घडली पिता-पुत्राची भेट; वडील तीन महिन्यांपासून होते बेपत्ता

**सुपे । प्रतिनिधी**

**मागील तीन महिन्यांपासून थाळनेर (जि. धुळे) येथून बेपत्ता असलेल्या पित्याची सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या मुलासोबत भेट सूपे (ता. बारामती) येथे घडून आली. संतोष शिरसाट (वय ६५) असे या पित्याचे नाव आहे.**

याबाबतचे वृत्त असे की, संतोष शिरसाट हे मागील आठवड्यापासून गावात फिरत होते. त्यांच्या अंगावर मळके कपडे तसेच दाढी आणि केस वाढलेले होते. ते हॉटेल श्वेता येथे आले. या वेळी हॉटेलमालक ओंकर इंगळे आणि तेथे असणारे अमोल धेंडे यांनी त्यांना नाव-पत्ता विचारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्वत:चे नाव संतोष शिरसाट सांगून थाळनेर येथील असल्याचे संगितले. मात्र, त्यांना थाळनेर कुठे आहे? हे सांगता येत नव्हते. या वेळी अमोल याला डीजे बँडची आवड असल्याने थाळनेर डीजे बँड ही इन्स्टाग्रामवर पोस्ट केली. त्या वेळी थाळनेर



हे धुळे जिल्ह्यात असल्याची माहिती समजली. त्यानंतर डीजे बँडमालकाचा मोबाईल शोधून थाळनेरच्या सरपंचाला फोन केला. या वेळी सरपंचाने थाळनेर गावात शिरसाट आडनावाची एक हजार कुटुंबे राहत असल्याचे सांगितले. पण, काही वेळात सरपंचाने माहिती घेऊन त्यांच्या मुलाचा मोबाईल नंबर धेंडे यांना शोधून दिला. त्यानंतर मुकेश शिरसाट यांच्याशी संपर्क करून तुझे वडील सुप्यात असून, तू लवकर ये, असे सांगितले. त्यांचा मुलगा मुकेश आल्यावर वडिलांना कुटुंबाच्या स्वाधीन केले. मुलगा सुप्यात येईपर्यंत धेंडे यांनी त्यांच्या वडिलांचे वाढलेले केस आणि दाढी केली. अमोलने या सर्व घाडामोडी सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केल्याने संतोष शिरसाट यांच्या कुटुंबाचा शोध लागला अन्? त्या पिता-पुत्राची भेट झाली. सोशल मीडियाचा किती चांगल्या प्रकारे वापर होतो, याचा चांगला अनुभव आल्याचे धेंडे यांनी सांगितले.

# सतर्क पोलिसांची तत्परता; हरवलेली दीड लाख रुपये किमतीची पिशवी परत मिळवून दिली

पुणे । प्रतिनिधी

पुणे ते कोल्हापूर प्रवास करून परतलेल्या कोथरूड येथील एका वयोवृद्ध महिलेला पोलिसांच्या तत्परतेमुळे हरवलेली दीड लाख रुपये किमतीची रोख रक्कम व चांदीचे दागिने परत मिळाले. या प्रामाणिक व चौकस कारवाईमुळे पुणे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सुगंधा मारुती खेरवर्डेकर ( ५५, रा. जय भवानी नगर, कोथरूड) या आज पहाटे २.३० वाजता कोल्हापूरहून लक्झरी बसने पुण्यातील स्वारगेट मेट्रो स्थानकात उतरल्या. उतरल्यानंतर त्यांना आपल्या सामानातील एक महत्त्वाची पिशवी, ज्यामध्ये अंदाजे दीड लाख रुपयांची रोख रक्कम व चांदीचे दागिने होते, एका रिक्षात विसरल्याचे लक्षात आले.



त्यानंतर खेरवर्डेकर यांनी त्वरित जवळील स्टेडियम पोलीस चौकीत संपर्क साधला. चौकीतील पोलिस कर्मचारी सागर आनंद काळे, मार्शल विनोद साळवी व नेताजी वसुदेव यांनी अत्यंत दक्षतेने आणि तत्परतेने कारवाई करत बस व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले.

फुटेजच्या आधारे संबंधित रिक्षाचा शोध घेण्यात आला आणि काही तासांच्या प्रयत्नांनंतर सदर पिशवी सुरक्षितरित्या शोधून काढण्यात आली. संबंधित रिक्षाचालकाची ओळख पटवून त्याच्याकडून पिशवीसह रोख रक्कम व दागिने महिलेच्या ताब्यात देण्यात आले. या संपूर्ण प्रामाणिक आणि उत्कृष्ट कार्यासाठी खेरवर्डेकर यांनी पुणे पोलिसांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

# आपले वाटोळे झालेय...! हिंजवडीचे सगळे आयटी पार्क बंगळूर, हैदराबादला चाललेत; अजित पवार संतापले

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन आठवड्यानंतर आज (दि. २६) पुन्हा आय टी पार्क हिंजवडीत पाहणी दौरा केला. दोन आठवड्यांपूर्वी दिलेल्या सूचनांचे कितपत पालन झाले आहे, हे तपासण्यासाठी आलेले अजित पवार कामात हलगर्जीपणा दिसताच आक्रमक झाले. यावेळी त्यांनी हिंजवडीचे सरपंच गणेश जांभूळकर यांना देखील खडेबोल सुनावले.

अजित पवार यांचा पाहणी दौरा सकाळी सहा वाजता हिंजवडीच्या क्रोमा चौकातून सुरू झाला. दौऱ्यादरम्यान रस्त्यांची दुरवस्था आणि रखडलेली कामे पाहून त्यांचा पारा चढला होता. त्याचवेळी हिंजवडी ग्रामपंचायतचे सरपंच गणेश जांभुळकर हे मंदिर पाडू नये असा




आग्रह करत होते. यावेळी अजित पवारांनी त्यांना चांगलेच सुनावलं. ''अहो असू द्या हो, धरण बांधताना मंदिरं जातातच की नाही? तुम्हाला जे सांगायचं ते सांगा, मी ऐकून घेतो आणि मग मला जे करायचंय ते मी करतो,'' अशा शब्दांत पवारांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते पुढे म्हणाले, ''आपलं वाटोळं झालंय हिंजवडीचं! सगळं आयटी पार्क माझ्या पुण्यातून, महाराष्ट्रातून बाहेर बंगळूर, हैदराबादला चाललंय. तुम्हाला त्याचं काही पडलेलं नाही. मी कशाला सकाळी सहा वाजता इथे आलोय? हे काम केल्याशिवाय आता गत्यंतर नाही,'' असे खडेबोल त्यांनी सरपंचांना सुनावले. यावेळी अजित पवार म्हणाले की, ''हिंजवडीत झालेल्या पहिल्या पावसाने अनेकांना त्रास सहन करावा लागला. ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आम्ही सगळ्यांनी गांभीर्याने घेतली आणि त्यानंतर हिंजवडीत काम करायला सुरुवात केली. प्रत्येक आठ ते दहा दिवसांनी या परिसराची पाहणी करण्याचे ठरवण्यात आलं, सगळ्या अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. सगळ्या अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन अडचणी सोडवण्यात येणार आहेत. काही ठिकाणी आम्हाला कठोर निर्णय घ्यावे लागतात. कोणालाही नाराज करायचं नाही. हिंजवडी परिसरातील वाहतुकीचं दुखणं कायमचं दूर करायचं असल्याने रस्त्यांचे रुंदीकरण करणार आहे. मागे दिलेल्या आदेशानुसार काही बांधकाम पाडावी लागली आहेत आणि ती पाडली आहेत.''


### मी जर मध्ये आलो तर माझ्यावरी ३५३ दाखल करा

आयटी पार्क हिंजवडी, माण आणि मारुंजीच्या विकास कामात जर कोणी आडवा येत असेल तर त्यांच्या विरोधात सरळ ३५३ दाखल करा. कुणाचाही विचार करू नका. मी जरी आडवा आलो तरी माझ्यावर पण ३५३ दाखल करा. त्याशिवाय हिंजवडी भागातील रस्ता आणि वाहतूक कोंडी चे प्रश्न सुटणार नाहीत. अशा अतिशय कडक सूचना अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि पीएमआरडीएचे आयुक्त डॉक्टर योगेश म्हसे यांना दिल्या आहेत.

# रेस्क्यू टिमला बिबट्याचा गुंगारा

पुणे । प्रतिनिधी

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर एप्रिल महिन्यात धावपट्टीच्या शेजारीच रात्रीच्या वेळी बिबट्या दिसला होता. यामुळे विमानतळ प्रशासनाने वनविभागाकडून तातडीने पावले उचलत रेस्क्यू टीमला पाचारण केले. बिबट्याच्या अस्तित्त्वाच्या खुणा सापडल्या, कॅमेऱ्यात त्याची उपस्थिती कैद झाली. मात्र. बिबट्या आजपर्यंत रेस्कू टिमच्या हाती लागेला नाही. आता, बिबट्याला पकडण्यासाठी वेगळ्या प्रकारे डिझाइन केलेले पिंजरे परिसरात लावण्यात येणार आहेत, असे पुणे विभाग मुख्य वनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी सांगितले.




भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यामुळे मे महिन्यात बिबट्याचे ऑपरेशन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते. पुणे विमानतळ हा एअरफोर्स बेस असल्यानेही हाय अलर्टवर होता आणि सुरक्षा प्रोटोकॉलमुळे तळावर जाण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. विमानतळ कर्मचाऱ्यांच्या पाहणी अहवालानंतर वनविभागाने १७ मे रोजी पुन्हा ऑपरेशन सुरू केले.

रेस्क्यू टिमने बिबट्याच्या हालचाली प्रतिबंधित करण्यासाठी पाच कि.मी.च्या परिसराला वेढा घातला होता. त्यानंतरही वन विभागाच्या हाती बिबट्याला लागलेला नाही. त्यामुळे आता वनविभाग या ऑपरेशनसाठी आपली रणनिती बदलण्याच्या विचारात आहे. बिबट्याला पकडण्याच्या आव्हानाशिवाय वनविभागाला हवाई दलाच्या परिसराच्या संवेदनशील भागात हालचालींवर निर्बंध यासारख्या काही ऑपरेशन आव्हानांचाही सामना करावा लागत आहे.

विमानतळ परिसरातील बिबट्या त्याचे स्थान तो सतत बदलत आहे. बिबट्यामुळे कोणत्याही उड्डाण ऑपरेशनवरही परिणाम झाला नाही हे दिलासादायक असले तरी रेस्क्यू टीम बिबट्याला पकडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. मात्र, हा संवेदनशील परिसर असल्याने त्याला पकडण्याच्या कामावर मर्यादा येत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

# भाटघर धरण ९५% तर निरा देवघर ८५% भरले; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



पुणे । प्रतिनिधी

पुणे पाटबंधारे विभागाने आज (दि. २६) भाटघर आणि निरा देवघर धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाल्याची माहिती दिली आहे. संध्याकाळी ५:०० वाजता भाटघर धरण ९५% तर निरा देवघर धरण ८४.५३% भरले आहे. पावसाच्या प्रमाणानुसार या धरणांमधून पाण्याच्या विसर्गात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दि. म. डुबल यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये. नदीच्या पात्रात सुरू असलेली बांधकामे, साहित्य आणि कामगारांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावे. तसेच, नदीकाठावरील सर्व गावांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी किंवा शेतीसाठी नदीपात्रात असलेले पंप सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सखल भागातील नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी आणि स्थानिक प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. पाटबंधारे विभागाने सर्व नागरिकांना आणि संबंधित यंत्रणांना खबरदारी बाळगण्याचे निर्देश दिले असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य धोका टाळण्यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

# पावसाचा तडाखा!

## कोथुर्णे पूल पाण्याखाली, गावांचा संपर्क तुटला; पवना धरणातून ७४१० क्युसेक्स विसर्ग



पवनानगर । प्रतिनिधी

पवना धरणातून ७४१० क्युसेक्सने सुरू झालेल्या जोरदार विसर्गामुळे कोथुर्णे पूल पाण्याखाली गेला असून, कोथुर्णे, वारू आणि मळवंडी या गावांचा पवनानगरशी संपर्क पूर्णतः तुटला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अविरत पावसामुळे धरण साठा झपाट्याने वाढला असून, धरण प्रशासनाने सकाळी ९ वाजता हा उच्च विसर्ग सुरू केला आहण शाळकरी विद्यार्थी यांना आता शिवली व ब्राम्हणोली मार्गे किंवा कडधे मार्गाने पवनानगर आणि कामशेतकडे प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन व्यवहार अडचणीत आले आहेत. धरण प्रशासनाने सांगितले की, पाणलोट क्षेत्रात अजूनही पाऊस सुरू असल्याने विसर्ग कमी-जास्त केला जाऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोणीही नदीपात्रात जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाने करत जनावरे, पंप यंत्रणा, शेती साहित्य तात्काळ सुरक्षित स्थळी हलवण्याचे निर्देश दिले आहेत. जलसंपदा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि नागरिकांनी अधिकृत सूचनांनुसारच वागावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खराब रस्त्यामुळे पावसाळ्यात विद्यार्थ्यांचे बेहाल

## लोकप्रतिनिधींना जाग कधी येणार?

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील नित्रुड ग्रामपंचायत हद्दीतील तांडा वाडी वस्तीवरील नागरिकांसह विद्यार्थ्यांना पावसाळ्यात खराब झालेल्या रस्त्यांमुळे बेहाल सोसावे लागत आहेत. केवळ निवडणुकीपुरता ग्रामीण भागातील नागरिकांचा कनवळा आणणाऱ्या लोक प्रतिनिधींना नेमकी जाग कधी येणार हाच प्रश्न विचारला जात आहे.**

पंढरपूर मेहकर पालखी महामार्गावरील नित्रुड ग्रामपंचायत हद्दीतील मोकुळ, रेखा नाईक, चंद्रभान, जानू नाईक तांडा,जाधव नगर,बडे वाडी या जवळपासच्या सर्व रस्त्यांची पावसाळ्यात दुरावस्था निर्माण झाली आहे. गुडघ्या इतक्या चिखलातून विद्यार्थ्यांसह नागरिकांना नित्रुडला जाताना प्रवास करावा लागतो. शाळेच्या बस व इतर वाहने या वाडीवस्तीत खराब रस्त्यांमुळे येत नाहीत. यामुळे नागरिकांचे बेहाल होत असून निवडणुकीत रस्त्यांची कामे करतो म्हणणाऱ्या लोकप्रतिनिधींना या रस्त्यांचा विसर का पडतो हा प्रश्न निर्माण झाला आहे. येथील गावकऱ्यांनी काही वर्षांपूर्वी रस्ता द्या अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार च्या घोषणा देत प्रशासनाला निवेदने दिली होती.उपोषणे केली, लोकप्रतिनिधींनी प्रशासनामार्फत लवकरात लवकर रस्त्याचे कामे करू असे प्रलोभणे दिली ती हवेतच विरली यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

> “ विद्यार्थी, गंभीर आजाराचे रुग्ण, बाळांतीन महिला, नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या रस्त्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेत मजबूत रस्ता देणे गरजेचे आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत रस्त्याचे कामे न झाल्यास आम्ही मतदानावर सर्वानुमते बहिष्कार टाकणार आहोत.
>
> –निखिल जाधव, नागरिक रेखानाईक तांडा



# पिंपळवंडी,पांगरी,वाडी–वस्ती परिसरात बिबट्याची दहशत

## बिबट्याचा बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील हांडेवाडी, घोळेवाडी, जाधववाडी, गायकवाडीत बिबट्याने उच्छाद मांडला असुन घोड्याचे शिंगरु,गाय,शेळ्या,बोकडे, मेंढ्या आदी भक्ष केल्या असुन शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढावले आहे.दरम्यान सदरील बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी सरपंच सुभाष घोळवे यांनी केली आहे.

शेतकरी सध्या पेरणी करुन पावसाची वाट पाहत बसला असुन त्यातच बिबट्याची भर पाडल्याने शेतकऱ्यांची जनावरे बिबट्या फस्त करीत असल्याने शेतकरी भयभीत झाला.असुन वनविभागाने तात्काळ या बिबट्याचा बंदोबस्त करुन शेतकऱ्यांना भयमुक्त करावे आणि शेतकऱ्यांना भरपाई द्यावी.अशी मागणी जोर धरत आहे. ◀◀ पान ३ वर




# परळी येथील विद्यार्थी दुर्घटना; पालकांनी विद्यार्थ्यांना जवळच्या प्राथमिक शाळेत प्रवेश द्यावा

### शिक्षणाधिकारी फुलारी यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातील टोकवाडी येथील इयत्ता दुसरी मध्ये शिक्षण घेत असलेल्या तळेगाव येथील वैष्णवी गोविंद मुंडे या खाजगी इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या मुलीचा दुचाकीच्या धडकेने जीव गेला. या संदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी, प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवी पर्यंतच्या मुलांना दूरच्या शाळेत न घालता, गावातच आणि जवळच्या शाळेत घालण्याचे आवाहन केले आहे.**

यासंदर्भात बोलतांना शिक्षणाधिकारी फुलारी म्हणाले, परळी येथील इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकणाऱ्या कुमारी वैष्णवी हिचा दुचाकीच्या धडकेने मृत्यू झाला. ही दुर्दैवी आणि दु:खदायक घटना आहे. या निमित्ताने बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या पालकांना आवाहन करण्यात येते की, प्राथमिक शाळेत प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांना नजिकच्या शाळेत प्रवेश द्यावा. दूरच्या शाळेत विद्यार्थ्यांना रिक्षा, स्कूल बस यामध्ये पाठवताना जास्तीचे विद्यार्थी बसविले जातात. त्यांच्या सुरक्षेची हमी नसते. धोका होईल, असे वर्तन होऊ नये. प्राथमिक शिक्षण कोठेही घेतले तरी, विद्यार्थी घडू शकतात. थोर विचारवंत, महापुरुष हे आपल्या गोवा शिकले. पालकांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत व अनुदानित शाळेतच मुलांना प्रवेश द्यावा. आपल्या नजरेसमोर गावात जवळच्या शाळेत प्रवेश द्यावा. लहान मुलांना समज नसते. सुरक्षितेचे सुरक्षितेची जाणीव नसते. यामुळे पालकांनी आणि शिक्षण प्रेमींनी या संदर्भात गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी फुलारी यांनी केले आहे.

# जलजीवनच्या नावाखाली रस्त्याची दुरावस्था

## शाळकरी मुलांना चिखलातून करावा लागतो प्रवास

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कुप्पा या गावात जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या पाइप लाईन च्या कामामुळे मुख्य रास्ता हा खांदल्याने या रस्त्यावर पावसाच्या पाण्यामुळे पूर्ण चिकल झाल्याचे दिसत आहे. हा मुख्य रस्ता असून या रस्त्यावरून शाळकरी मुलांचाही प्रवास असल्याने या मुलांना शाळेत जातांना चिखलातून प्रवास करावा लागत आहे व रहदारीचा ठिकाण असल्याने रस्त्यावर खड्डे पडल्याने पावसाचे पाणी साचून आणि चिकलामुळे येणाऱ्या काळात या घाणीमुळे रोगराई पसरून सर्वसामान्य माणसाला याचा आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागेल व काही जीवित हानीही होऊ शकते याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे सरपंच व गुत्तेदार यांनी सदरील रस्त्याची दुरव्यवस्था केली असून तात्काळ रस्त्याचे काम करावे असे गावकऱ्यांचे मत आहे.



हे फक्त येथीलच अडचण नसून गावातील प्रत्येक गल्लीमध्ये असेच रस्ते झाले असून या रस्त्यावर १० पर्यंत शाळा असून याच रस्त्याने त्या शाळेतील विध्यार्थीचा ◀◀ पान ३ वर

# ना. पंकजाताईंचा वाढदिवस वही, पेन व फळे वाटुन केला साजरा

गेवराई । प्रतिनिधी

प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गेवराई येथे शालेय विद्यार्थ्यांना कपडे,वही,पेन व फळे वाटप करण्यात आले यावेळी पंकजाताई मुंडे यांनी जो लोक उपयोगी कामाचा वसा घेतलेला आहे त्यामुळे सर्वसामान्य लोक हे मुख्य प्रवाहात येत आहेत ताईंच्या विविध योजना या समाजोपयोगी असल्यामुळे महाराष्ट्र मध्ये ताई ह्या सर्वात मोठ्या लोकनेत्या ठरलेल्या आहेत तसेच ताईंनी सत्तेचा जास्तीत जास्त फायदा जिल्ह्याला कसा करता येईल याबाबत लक्ष दिलेले आहे त्यामुळे गेवराई तालुक्यात विविध ◀◀ पान ३ वर



# म्हसोबावाडी पंचक्रोशीत बिबट्याचा धुमाकूळ, वनविभागाचे वारंवार दुर्लक्ष

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी, गहुखेल, पिंपरी घाटा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा धुमाकूळ होतं असल्याने गुराखी व शेतकऱ्यांना भरली भिती दि.२५जुलै रोजी मालकी रान माळावर स्वत:चे गुरे जारायला गेल्या शेतकरी ज्ञानदेव सिताराम शेकडे यांच्यावर अचानक हल्ला केला असता त्यांनी हुशारकीने स्वत:ची बाजु सारुन मात्र एका शेळीचा त्यांना जीव गमावा लागला ही खंत शेतकरी शेकडे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना असे सांगितले की जर....... जिवितहानी झाली असती तर काय वनविभाग झाले असते का....?गेल्या कित्येक शेतकऱ्यांची हनी या परिसरात घडली आहे मग अजुन पण वनविभाग काय मनुष्य बळाची वाट पाहत काय...?जर लवकरात लवकर तुम्ही जागे होऊन हा बंदोबस्त केला नाही तर मी वरिष्ठांना निवेदन देईल असा इशारा शेतकरी शेकडे यांनी दिला.



# माजलगाव बसस्थानकात पाकिटमारांना अटक; मुद्देमाल जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बसस्थानकातून प्रवाशाचा गर्दीचा फायदा घेऊन २२ हजार रुपये चोरणाऱ्या दोन चोरट्यांना माजलगाव शहर पोलिसांनी शोध घेत अटक करण्याची कामगिरी करत मुद्देमाल जप्त केला.

धनंजय किसनराव ताटे रा.परळी हे बसस्थानकातून प्रवास करत असताना गर्दीचा फायदा घेत. चोरट्यांनी त्यांच्या खिशातील २२ हजार रुपये चोरल्याची घटना घडली होती. याप्रकरणी ताटे यांच्यानविन बस स्थानक माजलगाव येथुन बीड येथे जात असताना बस मध्ये चढताना गर्दिचा फायदा घेवुन अज्ञात चोरट्याने २२ हजार रुपये चोरल्याची माजलगांव शहर पोलीस ठाणे येथे गुरनं. २०५/२०२५ कलम ३०२(२) बी.एन.एस.प्रमाणे अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासात सदरचा गुन्हा हा दत्ता ज्ञानेश्वर गुंजाळ रा. बलभीम नगर, पेठ बीड ता.जि.बीड याने कला आहे. त्यावरुन सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार १) सचिन साठे २) चंदु गायकवाड दोघे रा. गांधीनगर बीड ◀◀ पान ३ वर

# फोनपेवरून जबरदस्तीने रक्कम काढणाऱ्या दोघांना अटक

## ७४ हजार रुपये हस्तगत; अंबाजोगाई शहर पोलीसांची तत्पर कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत फोनपे ॲपद्वारे जबरदस्तीने रक्कम वसूल केल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यात अवघ्या दोन तासांत दोघा आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या कडून तब्बल ७४ हजार रुपयांची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

ही कारवाई दि. २२ जुलै २०२५ रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनंतर करण्यात आली. कोळकानडी (ता. अंबाजोगाई) येथील फिर्यादी सोमनाथ मदन ढगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्याकडून फोनपे ॲपच्या माध्यमातून ८४ हजार ९ रुपयांची रक्कम जबरदस्तीने काढून घेण्यात आली होती. या तक्रारीवरून पोलीसांनी भा.दं.सं. कलम ३०९(४), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली.

तपासादरम्यान आरोपी अविनाश शंकर देवकर (वय ३२, रा. वडारवाडा, अंबाजोगाई) आणि अजहर अब्दुल ◀◀ पान ३ वर



# मोमीनपुरा परिसर येथील सिमेंट रस्ता व नाली या विकास कामांचे लोकार्पण; शेख निजाम यांच्या प्रयत्नास यश

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील महत्त्वपूर्ण असा पेठ बीड विभागातील मिल्लत नगर, मोहम्मदया कॉलनी,बीड मामला,ढगे कॉलनी भागामध्ये मागील अनेक वर्षापासून रस्ते नाली नसल्यामुळे खुप त्रास सहन करावा लागला यापूर्वी अनेक वेळा सदरील भागामध्ये वेगवेगळ्या पक्षाच्या नेत्यांनी सदरील भागातील विकास कामांचे उद्घाटनाचे अनेक नारळ फोडले परंतु प्रत्यक्षात कधी या भागाचा विकास झाला नाही किंवा होऊ दिला नाही याबाबतचा प्रश्न या भागातील राहणाऱ्या नागरिकांच्या मनात होता रस्ते नाल्या विद्युत पथदिवे स्वच्छता यासारख्या नागरी मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना मोठ्या त्रासाला व अडचणींना सामोरे जावे लागत होते सदरील बाब त्या भागातील लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम यांच्या कानावर घातली असता त्यांनी माननीय नामदार तथा पालकमंत्री बीड जिल्हा श्री अजित दादा पवार माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब आमदार विजयसिंह पंडित साहेब यांच्या माध्यमातून सदरील भागातील रस्ते व नाल्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला मागील पन्नास वर्षापासून प्रलंबित राहिलेला विकास सदरील झालेल्या कामामुळे पूर्ण झालेला असून बाकी राहिलेला विकास काम लवकरच पूर्ण होणार असल्याचे चित्र दिसत आहे या झालेल्या विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या ◀◀ पान ३ वर















This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26